POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-२६४ ● मुंबई, सोमवार, २७ एप्रिल २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

# राज्यात मराठी सक्तीवरुन संघर्ष

## चालक संघटनांची गोरेगावमध्ये बैठक, तर मंत्रालयातही हाय व्होल्टेज बैठक

मराठी सक्तीवरुन मुंबईत वातावरण तापण्याची शक्यता आहे. मराठी सक्तीच्या निर्णयाविरोधात मुंबईतील गोरेगावात सोमवारी चालक संघटनांची बैठक होणार आहे. तर मंत्री प्रताप सरनाईक यांनीदेखील मंत्रालयात महत्त्वाची बैठक बोलावली आहे. या दोन्ही बैठकींकडे राज्याचं लक्ष लागणार आहे.

### मंत्री प्रताप सरनाईक यांनी मंत्रालयात बोलावली महत्त्वाची बैठक

'व्यवहारिक मराठी' सर्व व्यावसायिक प्रवासी वाहन चालवणाऱ्या चालकांना अनिवार्य करण्यासंदर्भात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी कामगार नेते शशांक राव आणि शिवसेना नेते संजय निरुपम यांच्यासह विविध रिक्षा आणि टॅक्सी चालक संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक बोलावली आहे. ही बैठक उद्या २७ एप्रिल रोजी परिवहन मंत्री यांच्या दालनात (४०१ विस्तारित इमारत, मंत्रालय) दुपारी साडेबारा वाजता होणार आहे. या बैठकीत प्रामुख्याने अमराठी चालकांना व्यवहारिक मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे, या मुद्यासह मराठी भाषा त्यांना शिकवण्यासाठी शासन कोणकोणते प्रयत्न करत आहे, यावर चर्चा होणार आहे.




**■ बातमी /लेख,**
**प्रीती दिपक नाईक**

राज्यातील रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. राज्यातील सर्व रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषेत प्रवाशांसोबत संभाषण करणे अनिवार्य असणार आहे. या निर्णयाची अंमलबजावणी 1 मे पासून करण्यात येणार आहे. पण या निर्णयावर अमराठी रिक्षा आणि टॅक्सी चालकांची नाराजी आहे. त्यांचा या निर्णयाला विरोध आहे. मराठी सक्तीच्या या निर्णयाविरोधात अमराठी रिक्षा आणि टॅक्सी चालक हे संपावर जाण्याच्या तयारीत आहे. हे रिक्षा आणि टॅक्सी चालक येत्या 4 मे पासून बेमुदत संपावर जाणार असल्याचे वृत्त समोर आलं होतं. पण परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मराठी भाषेबाबतचा निर्णय मागे घेणार नाही, असं स्पष्ट केलं आहे. तसेच मराठी बोलता आली नाही तर थेट परवाना रद्द करणार असल्याचा इशारा दिला आहे. तसेच थेट संपावर न जाता चर्चेसाठी पुढे या, असं आवाहन करत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी रिक्षा-टॅक्सी चालकांना चर्चेसाठी आमंत्रण दिलं आहे. अमराठी चालकांना मराठी शिकवण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे. मराठीच्या याच निर्णयावरुन उद्या दोन मोठ्या घटना घडणार आहेत.

**चालक संघटनांची गोरेगावमध्ये बैठक**

मराठी भाषा वाचता-लिहिता न येणाऱ्या ऑटो-रिक्षा आणि टॅक्सी चालकांचे परवाने 1 मेपासून रद्द करण्याच्या निर्णयाविरोधात मुंबई ऑटोरिक्षा-टॅक्सीमेन्स युनियन आक्रमक झाली आहे. या निर्णयाच्या निषेधार्थ युनियनने सरकारविरोधात एल्गार पुकारला आहे. पुढील आंदोलनाची दिशा ठरवण्यासाठी सोमवारी (27 एप्रिल) गोरेगाव येथे बैठक बोलावली आहे. गोरेगावस्थित केशव गोरे स्मारक ट्रस्ट हॉलमध्ये होणाऱ्या या बैठकीत विविध संघटनांचे पदाधिकारी सहभागी होणार आहेत. यै बैठकीत सरकारच्या निर्णयाविरोधातील पुढील भूमिका निश्चित केली जाणार आहे. या बैठकीत आंदोलनाची रूपरेषा जाहीर होण्याचीही शक्यता वर्तवली जात आहे. युनियनचे नेते शशांक राव यांनी चालकांना बैठकीस उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. सरकारने निर्णय मागे घेतला नाही, तर आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

युनियनने सरकारच्या निर्णयावर तीव्र आक्षेप घेत हा निर्णय अन्यायकारक आणि गैरकायद्याचा असल्याचा आरोप केला आहे. "फक्त मराठी येत नाही म्हणून परवाने रद्द करणे हा अतिरेकी निर्णय आहे. यामुळे हजारो चालकांच्या उदरनिर्वाहावर परिणाम होणार," असे युनियनकडून स्पष्ट करण्यात आले. या निर्णयामुळे शहरातील मोठ्या संख्येने चालकांचे परवाने धोक्यात येण्याची शक्यता असल्याने परिवहन क्षेत्रात अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, सरकारने 2019 मध्ये हा निर्णय घेतला होता, मात्र या निर्णयानंतरही अनेक ठिकाणी अमराठी रिक्षा-टॅक्सी चालक मराठीत संवाद साधत नसल्याच्या तक्रारी पुढे आल्या होत्या. त्यामुळे प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे. याच पार्श्वभूमीवर हा विषय गांभीयार्ने घेत राज्य शासनाने पुढाकार घेतला आहे. परिवहन विभागाच्या वतीने 1 मे रोजी ह्यमहाराष्ट्र दिनाह्चे औचित्य साधत या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. मराठी भाषेला नुकताच ह्यअभिजात भाषाह्ण दर्जा मिळाल्याने या उपक्रमाला अधिक महत्त्व प्राप्त झाले असून, हा निर्णय केवळ प्रशासकीय न राहता अमराठी वाहनचालकांमध्ये मराठी भाषेबद्दल आत्मीयता निर्माण करणारा ठरावा, यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

# शिक्षकांसाठी ई-केवायसी अनिवार्य

## मे महिन्याच्या वेतनावर परिणाम होण्याची शक्यता




**■भाईंदर। प्रतिनिधी,**

राज्य शासनाच्या वित्त विभागाने दिलेल्या आदेशानुसार शालार्थ प्रणालीद्वारे वेतन घेणाऱ्या सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांसाठी बँक खात्याची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आले आहे. ही प्रक्रिया वेळेत पूर्ण न झाल्यास मे महिन्याचे वेतन रोखले जाण्याची शक्यता असल्याने शिक्षक संघटनांनी तातडीने कार्यवाहीचे आवाहन केले आहे. राज्य शासनाने २७ मार्च २०२६ रोजी जारी केलेल्या परिपत्रकानुसार शासकीय, निमशासकीय तसेच अनुदानित संस्थांमधील सर्व कर्मचाऱ्यांनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक आहे. मात्र, अंमलबजावणीदरम्यान अनेक शिक्षकांना तांत्रिक अडचणी येत असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती ने सविस्तर मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. शिक्षकांनी आपले आधार कार्ड कोणत्या बँक खात्याशी लिंक आहे याची पडताळणी एनपीसीआय किंवा आधारच्या अधिकृत संकेतस्थळावरून करावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे. जर आधार क्रमांक पगार खात्याशी जोडलेला असेल तर स्वतंत्र ऑनलाइन प्रक्रिया आवश्यक नसून केवळ ई-केवायसी फॉर्म भरून बँकेत पडताळणी करावी लागेल. मात्र, आधार इतर खात्याशी लिंक असल्यास एनपीसीआय पोर्टलवर जाऊन पगार खाते अद्ययावत करणे आवश्यक आहे. तसेच नाव, जन्मतारीख किंवा इतर तपशीलांमध्ये तफावत असल्यास ती तातडीने दुरुस्त करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. या संदर्भात समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे आणि राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी सर्व शिक्षकांनी वेळेत ई-केवायसी पूर्ण करावी, जेणेकरून वेतन अडचणीत येणार नाही, असे आवाहन केले आहे. ही माहिती राज्य प्रसिद्धीप्रमुख राजेश सावरकर यांनी दिली आहे. एकूणच, प्रशासकीय आदेश आणि तांत्रिक प्रक्रिया यांचा समतोल राखत शिक्षकांनी तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# डोंबिवलीत रिक्षांवर स्टिकर मोहीम, मनसेची आक्रमक भूमिका

**■डोंबिवली। प्रतिनिधी,**

डोंबिवलीत मराठी भाषा आणि स्थानिक अस्मितेच्या मुद्द्यावर पुन्हा एकदा महाराष्ट्र नवनिर्माण सेना आक्रमक झाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. "मला मराठी समजते, मी मराठी बोलतो... माझ्या रिक्षात बसा" असा स्पष्ट संदेश देणारी स्टिकर मोहीम मनसेकडून राबवण्यात येत आहे.

डोंबिवली पश्चिमेतील स्टेशन परिसरात मनसे पदाधिकाऱ्यांकडून रिक्षांवर मराठी स्टिकर्स लावण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला. महाराष्ट्रात राहून व्यवसाय करताना मराठी भाषेला दुय्यम वागणूक देणं सहन केलं जाणार नाही, अशी ठाम भूमिका यामागे असल्याचं मनसेकडून स्पष्ट करण्यात आलं आहे.

## परप्रांतीय रिक्षाचालकांना काय दिला इशारा?

### का राबवली जात आहे स्टिकर मोहीम?

हा उपक्रम पक्षाचे नेते आमदार प्रमोद (राजूदादा) रतन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. नगरसेवक संदेश पाटील आणि नगरसेविका रसिका संदेश पाटील यांच्या पुढाकारातून हा कार्यक्रम राबवण्यात आला. यावेळी विधानसभा सचिव अरुण जांभळे यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. चार मे रोजी मराठी सक्तीच्या विरोधात होणाऱ्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मनसेने आपल्या शैलीत उत्तर देण्याचा इशारा दिला होता. त्याचाच एक भाग म्हणून ही स्टिकर मोहीम राबवली जात असल्याचं सांगितलं जात आहे.



**परप्रांतीय रिक्षाचालकांचा सकारात्मक प्रतिसाद**

रिक्षा ही सामान्य नागरिकांची जीवनवाहिनी असताना, त्याच रिक्षांमध्ये मराठी माणसालाच भाषेची अडचण भासते, ही गंभीर बाब असल्याचं मनसेने अधोरेखित केलं आहे. त्यामुळे हा उपक्रम केवळ स्टिकरपुरता मर्यादित नसून, मराठी भाषेचा सन्मान राखण्याचा संदेश असल्याचं पदाधिकाऱ्यांनी सांगितलं. विशेष म्हणजे, या मोहिमेला परप्रांतीय रिक्षाचालकांचाही सकारात्मक प्रतिसाद मिळताना दिसत आहे.

**ही विनंती नसून जबाबदारी**

अनेक चालकांनी मराठी समजून घेण्याची आणि बोलण्याची तयारी दर्शवत स्वेच्छेने स्टिकर लावले आहेत. महाराष्ट्रात सेवा द्यायची असेल, तर मराठी भाषेचा आदर करावाच लागेल ही विनंती नसून जबाबदारी आहे, असा स्पष्ट इशारा मनसेकडून देण्यात आला आहे. या उपक्रमात विधानसभा सचिव अरुण जांभळे, उपशहराध्यक्ष राजू पाटील, प्रेम पाटील, विभाग अध्यक्ष संजय चव्हाण, कदम भोईर, चेतन म्हात्रे, निलिमा भोईर, शाखा अध्यक्ष नितेश दिपनाईक, शर्मिला लोंढे तसेच मोठ्या संख्येने रिक्षा चालक व मनसे पदाधिकारी उपस्थित होते.

# मीरा रोडमध्ये २३.३ लाख रुपयांचे ड्रग्स जप्त, तिघांना अटक

**■मीरा रोड। प्रतिनिधी,**

मुंबईलगतच्या मीरा-भाईंदर शहरात पोलिसांनी गेल्या दोन दिवसांत वेगवेगळ्या कारवाईत एकूण तेवीस लाख तीस हजार रुपयांचे अमली पदार्थ जप्त केले आहेत. या प्रकरणांमध्ये तीन आरोपींना अटक करण्यात आली असून, पुढील तपास सुरू आहे.




मीरा-भाईंदर पोलिसांच्या अँटी-नारकोटिक्स सेलचे पोलिस निरीक्षक समीर शेख यांनी रविवारी सांगितले की, त्यांची टीम शहरातील विविध भागांत गेल्या दोन दिवसांपासून अमली पदार्थांविरुद्ध कारवाई करत आहे. त्याअंतर्गत २४ एप्रिल रोजी मध्यरात्री सुमारे पाऊण वाजता पोलिसांनी मीरा रोड येथील वेस्टर्न हॉटेलजवळ टियारा हिल्स सोसायटी परिसरात सापळा रचून दोन संशयितांना अटक केली.

त्यापैकी एक अरशद अली हुसेन अली नकवी (३८) याच्याकडून ५९ ग्रॅम मेफेड्रोन हा अमली पदार्थ जप्त करण्यात आला, ज्याची किंमत ११ लाख ८० हजार रुपये होती. तर त्याचा साथीदार हुसेन अली फिरोज अली बादामी (३१) याच्याकडून ४१.९ ग्रॅम मेफेड्रोन मिळाले, ज्याची किंमत आठ लाख ३८ हजार रुपये होती. या कारवाईदरम्यान गुन्ह्यासाठी वापरलेली एक मोटारसायकलही जप्त करण्यात आली आहे. या दोघांविरुद्ध काशीगाव पोलिस ठाण्यात एनडीपीएस कायद्याच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच, आणखी एका प्रकरणात पोलिसांनी नयानगर येथे वडा पाव विकणाऱ्या व्यक्तीला ड्रग्स विकताना रंगेहाथ पकडले. या प्रकरणात आरोपी फारूक युसुफ खान (५०) यांच्या घराची झडती घेतली असता 12.480 ग्रॅम हेरॉईन आढळून आली. नयानगर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला असून, या प्रकरणाचा तपास पोलिस निरीक्षक शैलेंद्र पाटील करत आहेत.

### विठ्ठल रुक्मिणीच्या पंढरपूरमधून खळबळजनक बातमी!

# मंदिराच्या दर्शन मंडपाजवळ सापडल्या दारुच्या बाटल्या




### भाविकांमध्ये संताप

या साऱ्या प्रकाराचा व्हिडीओ समोर आल्यानंतर भाविकांमध्ये संताप आहे. पंढरपूरचं विठ्ठल मंदिरातील हा सारा प्रकार भाविकांच्या श्रद्धेचा अपमान करणारा आणि अत्यंत गंभीयार्ने घेण्यासारखा प्रकार असल्याचं भाविकांनी म्हटलं आहे. मंदिर प्रशासन, पोलिस आणि स्वच्छतेची जबाबदारी असलेल्या संबंधित कंपनीने तातडीने चौकशी करून दोषींना शिक्षा द्यावी, अशी सर्व सामान्य भाविकांची अपेक्षा आहे. त्यामुळे आता याप्रकरणामध्ये नेमकी कोणावर आणि काय कारवाई होते आणि त्यासाठी किती वेळ लागतो हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

**■सोलापूर। प्रतिनिधी,**

राज्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असणाऱ्या पंढरपूरच्या विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शन मंडपातील परिसरामध्ये दारूच्या बाटल्या, गुटखा-माव्याच्या पुड्या आढळून आले आहेत. भाजपचे माजी शहराध्यक्ष विक्रम शिरसाट यांनी या प्रकाराचा समोर आणला आहे. भाजपा नेत्याने केलेल्या या आरोपीमुळे एकच खळबळ उडाली आहे.

**कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी**

मंदिर समितीच्या स्वच्छतेचे काम एका खाजगी कंपनीकडे सोपवण्यात आले आहे. तरीही मंदिरासारख्या पवित्र ठिकाणी अशा पद्धतीच्या वस्तू वारंवार आढळत आहेत. त्यामुळे कंपनीच्या कर्मचाऱ्यांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. अशी चुकीचं कृत्यं करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. शिरसाट यांनी लगेच सीसीटीव्ही फुटेज तपासून सखोल चौकशी व दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

**मंदिर समितीचे म्हणणे काय?**

ज्या दर्शन मंडपातून भाविक विठोबाच्या रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी जातात त्याच दर्शन मंडपाच्या परिसरामध्ये दारूच्या बाटल्या आढळल्याने खळबळ उडाली आहे. या सर्व प्रकरणाची चौकशी करून संबंधित कंपनी आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी भाजपचे माजी शहराध्यक्ष विक्रम शिरसाठ यांनी केली आहे. तर मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रवीण घम यांनी याप्रकरणी संबंधित कंपनीच्या सुरक्षा कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. यामध्ये जे दोषी असतील त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचा इशारा सुद्धा व्यवस्थापकांनी दिला आहे.

**हे प्रकरण उघडकीस आणणारे शिरसाठ आहेत कोण?**

हे सारं प्रकरण समोर आणणारे विक्रम शिरसाट हे पंढरपूरमध्ये ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तसेच भाजपा नेते म्हणून ओळखले जातात. ते पंढरपूर नगरपरिषदेचे माजी नगरसेवक आणि आरोग्य समितीचे माजी सभापती राहिले आहेत. याशिवाय त्यांनी पंढरपूरचे भाजपा शहराध्यक्षही राहिले आहेत. ते पंढरपूरच्या विकास आणि स्वच्छता मुद्द्यांवर सातत्याने आवाज उठवतात. शहरातील धूळ समस्या, नामसंकीर्तन सभागृहाचे नामकरण, गॅस तुटवडा, मंदिर परिसरातील स्वच्छता अशा विविध मुद्द्यांवर त्यांनी प्रशासनाकडे निवेदने दिली आणि आंदोलने केली आहेत.

# आरोग्य व्यवस्थेचे वाजले तीनतेरा! शस्त्रक्रियेनंतर महिलांना झोपवले जमिनीवर

**■बीड। प्रतिनिधी,**

सरकारी रूग्णालयामधून अनेक अशा बातम्या कानावर येत असतात, ज्यामध्ये रुग्णांना हवी ती सेवा पुरवली जात नाही. बऱ्याचदा तर अनेक धक्कादायक प्रकार देखील सरकारी रूग्णालयामध्ये घडले आहेत. बीडच्या केज तालुक्यात आरोग्य व्यवस्थेचे तीनतेरा वाजल्याचं पाहायला मिळालं आहे. केज तालुक्यातील विडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात कुटुंबकल्याण शस्त्रक्रिया झाल्यानंतर महिला रुग्णांना जमिनीवर झोपवण्यात आलं आहे. कुटुंबकल्याण शस्त्रक्रियेसाठी परिसरातील अनेक महिला या आरोग्य केंद्रात आल्या होत्या, मात्र या महिलांवर शस्त्रक्रिया केल्यानंतर त्यांना थेट जमिनीवर झोपवण्यात आलं होते. हा धक्कादायक प्रकार पाहून शासकीय रुग्णालयांवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.




गावागावात आरोग्य केंद्र आहेत, मात्र या आरोग्य केंद्रामध्ये अजूनही सोयी सुविधांचा अभाव आहे, त्यामुळे रूग्णांवर अशी जमिनीवर झोपण्याची वेळ येते. त्यामुळे रुग्णालय प्रशासनानं देखील रुग्णालयात किती सुविधा आहे, बेड आहे की नाही? हे सर्व तपासूनच रुग्णावर उपचार केले पाहिजे, जेणेकरून रुग्णांवर आज जी परिस्थिती आली ती येणार नाही.

बीड जिल्हातील केज तालुक्यामधील प्राथमिक रुग्णालयात एक लाजीरवाणा प्रकार समोर आला आहे. केज तालुक्यातील विडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील एक कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेसाठी रुग्णालयामध्ये आले होते. यावेळी शस्त्रक्रिया झाल्यानंतर चक्क पाच महिलांना जमिनीवर झोपवण्यात आले. उपचार केल्यानंतरचा हा संतापजनक प्रकार समोर आला आहे. महिलांसाठी रूग्णालायत बेड नव्हते तर त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्याची घाई का केली असा सवालही यानिमित्ताने उपस्थित केला जात आहे.

22 एप्रिलला या एक शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये 15 महिला एकूण शस्त्रक्रिया करण्यासाठी आल्या होत्या, यावेळी फक्त 10 च बेड रुग्णालयामध्ये उपलब्ध होते. प्राथमिक आरोग्य केंद्रातील या प्रकारानंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांनी स्पष्टीकरण दिलं आहे, रूग्णालयात बेडची कमतरता होती. 10 बेड उपलब्ध असल्यानं त्या परिस्थितीत उपचार करण्यासाठी रुग्णांनीच सहमती दर्शवल्याचं वैद्यकीय अधिकारी रोशन गायकवाड यांनी सांगितलं.

हा प्रकार समोर आल्यानंतर आता शासन यावर पडदा टाकण्याचा प्रयत्न करत आहे. त्यांनी सांगितले की त्या महिलांना विचारल्यानंतर आम्ही त्यांना खाली झोपवले होते असे अधिकाऱ्याने उत्तर दिले. त्याचबरोबर डॉ. रोहन गायकवाड याने देखील हा दावा केला आहे. पण हे कितपत योग्य आहे यावर अनेक प्रश्न शासनावर उपस्थित केले जात आहेत. आता आबिटकर कारवाई करणार की, डॉक्टरांच्या खुलाशावर समाधान मानून त्यांना पाठीशी घालणार, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# फेसबुकवर क्लिक केलं अन् 4 दिवसात... मुंबईत नर्ससोबतची घटना पाहून तुमचेही डोळे उघडतील

**■मुंबई। प्रतिनिधी,**

ऑनलाईन शॉपिंग करताना दिसणाऱ्या आकर्षक ऑफर्स कधीकधी किती भयानक ठरू शकतात, याचे धक्कादायक उदाहरण मुंबईत समोर आले आहे. एका खासगी रुग्णालयात काम करणाऱ्या नर्सला २९९ रुपयांचा ड्रेस खरेदी करणे चक्क १ लाख रुपयांना पडले आहे. अवघ्या ५ दिवसांत सायबर भामट्यांनी तिची फसवणूक करून कष्टाची कमाई लुटली. याप्रकरणी देवनार पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून तांत्रिक पुराव्यांच्या आधारे तपास सुरू आहे.

तक्रारदार नर्स ही मुंबईतील एका नामवंत खासगी रुग्णालयात कार्यरत असून ती सध्या एका वसतिगृहात राहते. १६ एप्रिल रोजी तिने फेसबुकवर एक जाहिरात पाहिली, ज्यामध्ये अतिशय सुंदर ड्रेस अवघ्या २९९ रुपयांत विकला जात होता. स्वस्त किंमतीमुळे तिने त्या जाहिरातीवर क्लिक केले. त्यानंतर खरेदीची प्रक्रिया सुरू केली. हीच तिची पहिली चूक ठरली.

सायबर गुन्हेगारांनी तिला व्हॉट्सअ‍ॅपवर संपर्क साधून ऑर्डर कन्फर्म करण्यास सांगितले. त्यानंतर फसवणुकीचा सिलसिला सुरू झाला. तिला




सुरुवातीला ड्रेसचे २९९ रुपये भरण्यास सांगितले. त्यानंतर पेमेंट केल्यानंतर शिपिंग चार्जेस पेडींग आहेत, असे सांगत पुन्हा पैसे मागितले. त्यानंतर जीपीएस ट्रॅकिंग, व्हेरिफिकेशन कोड आणि पत्ता पडताळणी यांसारख्या असंख्य बाबींचे नाव सांगून हजारो रुपये भरण्यास भाग पाडले. याबद्दल दरवेळी नर्सने विचारणा केली असता, हे पैसे फक्त सुरक्षेसाठी असून ऑर्डर पोहोचताच यातील बहुतांश रक्कम तुम्हाला परत मिळेल, असे सांगून तिला विश्वासात घेतले गेले. अशा प्रकारे १६ ते २० एप्रिल या पाच दिवसांत नर्सने एकूण १ लाख रुपये सायबर भामट्यांच्या विविध बँक खात्यात ट्रान्सफर केले.

जेव्हा एक लाख रुपये देऊनही ड्रेस मिळाला नाही आणि समोरच्या व्यक्तीने अजून पैशांची मागणी सुरूच ठेवली, तेव्हा नर्सला शंका आली. यानंतर तिला फसवणूक झाल्याची खात्री पटली. तिने तात्काळ सायबर गुन्हे शाखेच्या १९३० या हेल्पलाइन क्रमांकावर कॉल करून तक्रार नोंदवली. त्यानंतर देवनार पोलीस ठाण्यात अधिकृत एफआयआर दाखल करण्यात आला.

देवनार पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बनावट फेसबुक जाहिराती आणि फेक डिलिव्हरी एजंटचा वापर करून ही फसवणूक करण्यात आली आहे. यामुळे नागरिकांनी कोणतीही अनोळखी लिंक किंवा फेसबुकवरील संशयास्पद स्वस्त जाहिरातींवर विश्वास ठेवू नका. ऑनलाईन पेमेंट करताना सावधगिरी बाळगा, असे आवाहन पोलिसांनी नागरिकांना केले आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# प्रथम स्वतः अंगीकार करा!




महाराष्ट्रामध्ये १ मेपासून, म्हणजेच महाराष्ट्रदिनापासून टॅक्सी, रिक्शा, ओला, उबेर यांच्या चालकांसाठी मराठी भाषा लिहिता-बोलता येणे अनिवार्य करण्यात येणार आहे. यासाठी 'महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९'मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. त्यामुळे भविष्यात चालकांना वाहन परवाना देतांना किंवा नूतनीकरण करतांना चालकाच्या मराठी भाषेचे ज्ञानही पडताळले जाणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या या निर्णयामुळे राज्यात संमिश्र पडसाद उमटत आहेत. काही वृत्तवाहिनींच्या प्रतिनिधींनी काही टॅक्सी, रिक्शा, ओला, उबेर यांच्या चालकांच्या प्रतिक्रियाही घेतल्या. यामध्येही काहींनी निर्णयाचे स्वागत केले, तर काहींनी नापसंती व्यक्त केली. २४ एप्रिल या दिवशी या निर्णयावरून मनसेचे कार्यकर्ते आणि हिंदी भाषिक यांच्यात वादावादीही झाली. थोडक्यात मराठी भाषा अनिवार्य करण्याचा विषय वादाकडे वळत आहे. मातृभाषेवरून वाद होणे, हे ना महाराष्ट्रासाठी चांगले आहे, ना देशाच्या एकतेसाठी चांगले आहे. महाराष्ट्रात रिक्शा, टॅक्सी, ओला, उबेर यांच्या चालकांमध्ये अन्य भाषिकांची संख्या मोठी आहे. यांतील बहुतांश चालक अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात रहातात. त्यांची ओळखही 'मुंबईकर' अशी झाली आहे; परंतु अनेक चालक मराठीतून बोलणे टाळतात. अनेकदा प्रवासी मराठीत बोलत असूनही अन्य भाषिक चालक मराठी बोलण्याचे सौजन्यही दाखवत नाहीत. यामध्ये काही जणांना मराठी भाषा खरोखरच येत नसेल, असे असू शकते. काही जण मात्र जाणीवपूर्वक मराठी बोलण्याचे टाळतात. त्यामुळे याची परिणती वादात होते. अशा प्रकारच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्यामुळे चालकांसाठी मराठी भाषा अनिवार्य करण्यात आल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी म्हटले. अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात राहूनही येथील मातृभाषा शिकून न घेणे, हे चुकीचेच आहे. जेथे आपल्या उदरभरणाची व्यवस्था होते, त्या ठिकाणची मातृभाषा शिकणे, हे रोजीरोटीसाठी आवश्यक ठरते; परंतु त्यापेक्षाही तेथील अस्मितेचा आदर करणे, हे खरे राष्ट्रीयत्वाचे लक्षण आहे. प्रत्येकाने अन्य राज्यांच्या भाषेचा आदर करणे, हे यातूनच घडू शकते; परंतु प्रत्यक्षात मात्र तसे होत नाही, हे दुर्दैवाचे आहे. स्वभाषेची अस्मिता न बाळगणे आणि अन्यांच्या भाषांचा आदर न करणे यांतूनच भाषिक वाद निर्माण होत आहेत. ज्या राज्यात रहातो, तेथील मातृभाषेचा आदर कुणी राखत नसेल, तर अशांना त्यांची जागा दाखवणेही आवश्यकच आहे; परंतु अशी वेळ का येते, याचाही विचार व्हायला हवा. अनेक वर्षे महाराष्ट्रात रोजीरोटीसाठी रहाणारे मराठी शिकले नाहीत, यात मराठी भाषिकांचेही अपयश आहे. याचेही आत्मचिंतन मराठी माणसाने करणे आवश्यक आहे, अन्यथा भविष्यात मराठीची स्थिती आणखी दयनीय होईल. मराठी भाषेला अभिजात (समृद्ध) भाषेचा दर्जा मिळणे आणि तिची अस्मिता टिकवणे, हे दोन्ही विषय भिन्न आहेत. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्यामुळे महाराष्ट्रात तिची अस्मिता जपली गेली, असे झालेले नाही. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यावर केंद्रशासनाकडून मराठी भाषेच्या प्रचार-प्रसारासाठी निधी उपलब्ध होईल, अन्य राज्यांतील विद्यापिठांमध्ये मराठी भाषेतून अभ्यासक्रम शिकवले जातील आणि महाराष्ट्र अन् महाराष्ट्राच्या बाहेर मराठी भाषेचे विविध कार्यक्रम सादर होतील, उपक्रम राबवले जातील; परंतु मुळात महाराष्ट्रात रहाणारा मराठी माणूस जोपर्यंत स्वतः मराठी भाषेविषयी अस्मिता बाळगणार नाही, तोपर्यंत 'देशात अभिजात आणि महाराष्ट्रात दप्तरात', अशी मराठीची स्थिती आहे. जेव्हा मराठी माणूस स्वतःच्या मातृभाषेचा आदर करील, तेव्हाच अन्यही करतील. हे कटू असले, तरी वस्तूस्थिती नाकारून चालणार नाही. ह्यटॅक्सी आणि रिक्शा चालक मराठी बोलत नाहीत, त्यांनी महाराष्ट्राप्रती आदर म्हणून मराठी बोलायला हवेह्न, यामध्ये दुमत असण्याचे कारणच नाही; परंतु केवळ धाकदपटशाने हा प्रश्न सुटणारा नाही. महाराष्ट्राच्या विधीमंडळामध्ये मराठी भाषेच्या अस्मितेचा कायदा पारित झाला, त्या विधीमंडळांच्या सभागृहांत नियमित प्रवेश करतांना आमदारांना स्वतःची स्वाक्षरी करून जावे लागते. काही वर्षांपूर्वी शिवसेनेचे आमदार दिवाकर रावते यांनी मराठी अस्मितेच्या प्रश्नावर बोलतांना महाराष्ट्रातील निम्म्याहून अधिक आमदार सभागृहात प्रवेश करतांना इंग्रजीत स्वाक्षरी करत असल्याचे निदर्शनास आणून दिले, म्हणजे सभागृहात मराठी अस्मितेचा कायदा पारित करायचा; मात्र स्वतः इंग्रजीत स्वाक्षरी करून भाषेविषयी अस्मिता दाखवायची नाही. मराठीची दुःस्थिती यामुळेच झाली आहे. मराठीजन अन्य भाषिकांना मराठीत बोलण्याचा आग्रह करतात, तेव्हा त्यांनी प्रथम मराठीची अस्मिता स्वतःच्या बोलण्यातून आणि लिहिण्यातून अंगीकारायला हवी. रिक्शा आणि टॅक्सी चालकांनी मराठी बोलावे, यासाठी कायदा करावा लागतो; परंतु त्यांच्याशी प्रथम हिंदीतून बोलण्यास प्रारंभ करणारे कोण आहेत? मराठी भाषिकांनी मराठीची अस्मिता बाजूला सारल्यामुळेच आज कायदा करण्याची वेळ आली आहे, ही वस्तूस्थिती नाकारून चालणार नाही. महाराष्ट्राची अस्मिता म्हणून मराठी शिकायला हवी, ही आदराची भावना एकवेळ बाजूला ठेवू; परंतु रोजीरोटीसाठी तरी मराठीविना पर्याय नाही, ही आवश्यकता अन्य भाषिकांमध्ये मराठी माणूस निर्माण करू शकला नाही, हे मराठी माणसाचे अपयश आहे. रिक्शा, टॅक्सी चालकांना मराठी भाषा अनिवार्य करण्याचा महाराष्ट्र शासनाने केलेला कायदा निश्चितच स्वागतार्ह आहे. यामध्ये जे अन्य भाषिक आहेत, त्यांना मराठी शिकवण्यासाठी परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतलेली भूमिकाही स्वागतार्ह आहे. याविषयी हिंदी भाषिकांनीही सामंजस्यपणा दाखवायला हवा. मराठी भाषा अनिवार्य करण्याला राजकीय वा अराजकतेचे वळण न देता प्रत्येक राजकीय पक्षांतील हिंदी भाषिक नेत्यांनी कार्यकर्त्यांना मराठी भाषा शिकून घेण्याचे आवाहन करणे आवश्यक आहे. मराठी आणि हिंदी या दोन्हीही भारतीय भाषा आहेत. त्यामुळे राजकीय पक्षांनी राजकारणापलीकडे जाऊन भूमिका घेणे, हिंदी भाषिकांनी मराठीविषयी आदर बाळगणे आणि मराठी माणसाने मातृभाषेविषयी अस्मिता जपली, तर भाषावादाचा हा प्रश्न सुलभ होईल. शेवटी स्वकीय भाषेवरून एकमेकांच्या उरावर बसून वा राष्ट्रीय हानी करणारी आंदोलने करून काय साध्य होणार? राष्ट्रीयत्वाची भावना जोपासली, तर 'अन्यांच्या मातृभाषेचा आदर करा', हे सांगण्याची वेळ येणार नाही; कारण जो स्वतःच्या मातृभाषेचा आदर बाळगतो, तोच दुर्सयाच्या मातृभाषेचा आदर करू शकतो!

# शिवराळांची सद्दी

पानसरे यांनी छत्रपती शिवरायांचा एकेरी उल्लेख केल्याच्या मुद्द्यावरून गायकवाड यांनी पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना विचारलेला जाब कोणताही सुसंस्कृत समाजात शोभणारा नाही.

अज्ञानाला अहंकाराची जोड मिळाली आणि त्यात सत्तेतून येणाऱ्या मुजोरपणाची भर पडली, की काय घडू शकते, हे हल्ली महाराष्ट्रात अनेकदा दिसते. दिवंगत कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या 'शिवाजी कोण होता' या पुस्तकाच्या प्रकाशकाला बुलडाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी अर्वाच्य भाषेत केलेली शिवीगाळ आणि जीवे मारण्याची दिलेली धमकी हे या मालेतील ताजे प्रकरण. ज्या छत्रपती शिवरायांनी शत्रूच्या गोटातील महिलांना मातेसमान वागवले, महिलांशी गैरवर्तनाबद्दल कडक शिक्षा ठोठावल्या; त्याच महाराजांचे नाव घेऊन गायकवाड यांनी इतरांच्या आया-बहिणींचा केलेला उद्धार साऱ्या महाराष्ट्राची मान शरमेने झुकवणारा आहे.

एकीकडे महिलांना संसदेत प्रतिनिधित्व मिळण्याचा मुद्दा त्यांच्या सन्मानाशी जोडला जात असताना, याच महिलांच्या सन्मानाला गायकवाड यांनी प्रत्येक शिवीगणिक धक्का पोहोचवला आहे. आपली शिवराळ भाषा साऱ्या महाराष्ट्राने ऐकल्यानंतरही आपल्या भूमिकेवर कायम असलेले गायकवाड यांनी दिलगिरी व्यक्त केली, तरी त्यांना खरोखरीच पश्चात्ताप झाला काय, हा प्रश्न आहेच. त्यांच्या पक्षाची यावरील, 'भाषा चुकीची; पण मुद्दा योग्य,' ही भूमिका म्हणजे गुळमुळीत सारवासारवच. लोकप्रतिनिधींची भाषा, सार्वजनिक वर्तन आणि महाराष्ट्राची बदललेली विचारसंस्कृती यांबाबत अंतर्मुख होण्याची गरज या प्रकरणाने पुन्हा समोर आली आहे.

मुळात पानसरे यांच्या शिवप्रेमाबाबत शंका घेणेच अज्ञानमूलक आहे. शिवाजी महाराजांचे राजकारण, प्रशासन पद्धती, सर्वसामान्य शेतकऱ्यांचा त्यांनी घेतलेला कैवार आणि सर्वांना सोबत घेऊन जाण्याची धार्मिक सहिष्णुता या पैलूंवर पानसरे यांनी या पुस्तकातून प्रकाश टाकला. महाराजांचे आकलन करून घेण्यासाठी हे पुस्तक उपयुक्त आहे. म्हणूनच १९८८मधील हे पुस्तक आजही मोठ्या संख्येने वाचले जाते. त्यांच्या मांडणीबाबत वेगळी मते असू शकतात; परंतु पुस्तक न वाचता, एकेरी उल्लेखाबाबत शिवीगाळ अज्ञानमूलक आणि मुजोरपणा दाखविणारी आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे अवघ्या महाराष्ट्राचे दैवत.

आपल्या देवाला सगळेच आपापल्या दृष्टिकोनांतून 'गोब्राह्मणप्रतिपालक', 'कुळवाडीभूषण', 'जाणता राजा', 'रयतेचा राजा' अशा वेगवेगळ्या नावांनी भजतात-पूजतात. अशा वेळी 'माझेच म्हणणे खरे' असा आग्रह सोडून इतरांचेही ऐका-वाचायला हवे. हे झाले सामान्यज्ञान; पण त्याच्याशीच फारकत घेण्याची संस्कृती हल्ली फोफावत आहे. राहतो मुद्दा एकेरी उल्लेखाचा. आपल्या दैवताचा उल्लेख भक्तमंडळींकडून बहुतेकदा एकेरी होतोच. त्यात भक्ती असते आणि आपुलकीही. यशवंतराव चव्हाण यांच्यासारख्या दिग्गजांनी हीच बाब अधोरेखित केली. कोल्हापूर विद्यापीठाला 'छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ' असे नाव देण्याची सूचना आली, तेव्हा चव्हाण यांनी 'या नावाचे लघुरूप होऊ शकते,' असे सांगून 'शिवाजी विद्यापीठ' नाव कायम ठेवले. त्यामुळेच शिवरायांच्या नावासह ते सर्वतोमुखी राहिले. त्याउलट मुंबईतील 'छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस'चा 'सीएसएमटी' असा अपभ्रंश झाला. दैवते किंवा महापुरुषांच्या अशा एकेरी उल्लेखांमध्ये 'अनादर' नसून 'आपलेपणा' आहे, हे समजावण्याची वेळ महाराष्ट्रात यावी, हे आपले दुर्दैव.

दृक-श्राव्य माध्यमे आणि समाजमाध्यमांच्या विस्तारानंतर वाचाळ-शिवराळांची सद्दी वाढत आहे. चुकीची भाषा वापरल्याबद्दल दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आत्मक्लेष करून घेतला होता. आता सभ्य भाषेच्या सर्व मर्यादा बिनदिक्कत पार करणारे आणि अश्लाघ्य-आगलाव्या भाषेचा वापर करणारे 'मोठे नेते' ठरताहेत. त्यांचे नेतेही त्यांना पाठीशी घालतात. संबंधित व्यक्ती कोणत्या पक्षाची-विचारांची आहे, हे पाहून सोयीस्कर भूमिका घेतल्या जातात. सर्व पक्षांमधील कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण-मार्गदर्शन शिबिरे घेण्याची पद्धत आता मागे पडली आहे. ताजी घटना राजकीय व्यवस्थेचे नैतिक अधःपतनच म्हणावी लागेल. अशी प्रकरणे समोर आल्यावर 'सोडणार नाही', 'कडक शिक्षा करू' अशा इशाऱ्यांपलीकडे जाऊन कारवाई केली, तरच 'पुरोगामी' महाराष्ट्रात विचारांचे आदानप्रदान आणि खुल्या चर्चेची संस्कृती थोडीफार टिकण्याची शक्यता आहे.

## कागदी इशाऱ्यांत नाचते मराठी...

वारंवार इशारे देऊनही मराठी न शिकवणाऱ्या शाळांच्या विरोधात आता राज्य सरकारने दंड आणि मान्यता रद्द करण्याचे हत्यार उपसले आहे. रिक्षा आणि टॅक्सीचालकांना मराठीत बोलण्याच्या सक्तीपाठोपाठ आता मराठी भाषा विभागाने याबाबतचा आदेश काढला आहे. वास्तविक २०२०मध्येच राज्यातील सर्व माध्यमांच्या आणि सर्व बोर्डांच्या शाळांमधील पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना मराठी विषय शिकवण्याची सक्ती करण्यात आली होती; मात्र, अनेकदा आदेश-इशारे दिल्यानंतरही विशेषतः खासगी इंग्रजी शाळा आणि ह्यसीबीएसईह्न व ह्यआयसीएसईह्न बोर्डाच्या शाळांकडून त्याचे पालन होत नसल्याचे उघड झाल्याने सरकारने कडक पवित्रा घेतलेला दिसतो. मराठीच्या अध्यापन-अध्ययनासाठी वेळप्रसंगी कठोर भूमिका घेणे स्वागतार्हच आहे; मात्र त्यामागील कारणांचा विचार केल्यास केवळ दंडात्मक कारवाई करून परिस्थितीत सुधारणा होणार का, याचे उत्तर सरळसोपे नाही, हे लक्षात येते. कायदे-नियमांच्या अंमलबजावणीची कमकुवत यंत्रणा आणि शाळांचे दुर्लक्ष यांबरोबरच पालकांची याबाबतची अनास्थाही याला कारणीभूत आहे. त्यामुळेच शाळांमध्ये मराठी शिकणे-शिकवणे सुलभ व्हावे, यासाठी सर्वच घटकांनी मिळून व्यापक उपाय योजणे गरजेचे आहे. हिंदीसक्तीच्या विरोधात मराठीजनांच्या भावना तीव्रपणे प्रकट झाल्या, तेवढ्या प्रमाणात मराठी शिकवण्याच्या सक्तीसाठी सर्वदूर आग्रह दिसून येत नाही, हे दुर्दैवी वास्तव आहे. त्यामुळेच सरकारने मराठीसक्ती केल्यानंतर सहा वर्षांनीही त्याची रडतखडत अंमलबजावणी होताना दिसते. ह्यशाळांमध्ये मराठी भाषेचे सक्तीचे अध्यापन व अध्ययन अधिनियम २०२०ह्न लागू झाल्यानंतरही खासगी इंग्रजी शाळा आणि राज्य बोर्ड वगळता अन्य बोर्डांच्या शाळांनी तो गांभीर्याने घेतला नाही. अनेक शाळांमध्ये वेळापत्रकातून मराठीच्या तासिकाही हरवलेल्या दिसतात; तर काही शाळांमध्ये विद्यार्थी मराठीत बोलल्यास शिक्षा होत असल्याचीही संतापजनक उदाहरणे आहेत. या पार्श्वभूमीवर दोन वर्षांपूर्वी सरकारने त्यांना असाच इशारा दिला होता; मात्र या शाळांनी त्यालाही केराची टोपली दाखवली. आता याच्या अंमलबजावणीसाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पथकांमार्फत तपासणी करून एक लाख रुपयांपर्यंतचा दंड आणि त्यानंतर शाळांची मान्यता काढून घेण्याचा आदेश काढण्यात आला आहे. आजवर कागदी घोडे नाचवणाऱ्या सरकारने घेतलेल्या या कडक भूमिकेचे स्वागतच केले पाहिजे; मात्र प्रश्न सुटण्यासाठी केवळ अशा कारवायांचा दबाव पुरेसा आहे का, याचाही विचार करावा लागेल. ह्यसीबीएसईह्न आणि ह्यआयसीएसईह्न आदी बोर्डांना संलग्न असलेल्या शाळा ह्यना हरकत प्रमाणपत्रह्न वगळता मान्यतेसाठी राज्य सरकारच्या अधिकारक्षेत्रात येत नाहीत; त्यामुळे त्यांची मान्यता काढून घेणे प्रशासकीयदृष्ट्या शक्य आहे का, याबाबत जाणकारांना शंका आहे. विद्यार्थ्यांना मराठीचे अध्यापन करण्यात या शाळांपुढील अडचणींमधूनही मार्ग काढणे आवश्यक आहे. अन्य बोर्डांच्या शाळांमध्ये मराठी शिक्षणाला गुण किंवा श्रेणीचा पुरेसा आधार नाही, त्यामुळे थातुरमातुर स्वरूपात, जमेल तसे आणि जमेल तेवढ्या मराठी अध्यापनाचा उपचार पार पाडला जातो. अनेक शाळांमध्ये मराठीच्या अध्यापनासाठी पुरेसे पात्र शिक्षक; पुस्तके-शैक्षणिक साधनेही नाहीत. अशा समस्यांचे निराकरण प्रथम केले पाहिजे.

# खाल्लेल्या मिठाला तरी जागा!



मराठीत एक म्हण आहे, खाल्लेल्या मिठाला तरी जागा, त्यालाच समान अशी 'जिस थाली में खाते हो, उसी में छेद करना ठिक नही', अशी हिंदीत म्हण आहे. या हिंदी म्हणीची आठवण करून देण्याची वेळ आली आहे. कारण मुंबईत राहून पोट भरणाऱ्या अमराठी रिक्षा-टॅक्सीवाल्यांनी मराठी भाषा बोलण्याला जाहीर विरोध केला आहे. लाजिरवाणी बाब म्हणजे हा विरोध महाराष्ट्रातच झाला आहे. मराठी भाषेच्या सक्तीविरोधात 4 मेपासून राज्यातील १५ लाख रिक्षा-टॅक्सीचालक संपावर जाणार आहेत, असा इशारा ऑटोरिक्षा चालक-मालक संघटना संयुक्त कृती समिती महाराष्ट्र संघटनेचे अध्यक्ष शशांक राव यांनी दिला आहे. मराठी सक्ती मागे घेईपर्यंत संप सुरू राहील, असेही ते म्हणाले आहेत. महाराष्ट्रात मराठी भाषा सक्तीची केली तर विरोध असण्याचे कारण काय? ज्या राज्यात रोजीरोटी कमावतो तिथली भाषा बोलण्यात कमीपणा कशाला मानायचा? मात्र, दुसऱ्याच्या घरातही आपलेच राज्य असावे, अशी विकृत महत्त्वाकांक्षा असणाऱ्यांना हे कधीही कळले नाही. म्हणूनच मराठीविरोधाचा समाचार घ्यावाच लागेल. यापूर्वी याच महाराष्ट्रात दुकाने, आस्थापनांवर मराठी फलक न लावण्याची हिंमत येथील व्यापाऱ्यांनी दाखवली होती. हे व्यापारी कोण, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. अखेर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने मराठी फलकाला विरोध करणाऱ्या व्यापाऱ्यांना चांगलेच फैलावर घेत कोटार्तील खटल्यांवर पैसा खर्च करण्यापेक्षा तुम्ही साईनबोर्ड विकत घेऊन लावा, या शब्दांत सुनावले होते. त्यानंतरही सर्व ताळ्यावर आलेले नाहीत.

आता 1 मे म्हणजेच महाराष्ट्र दिनापासून परवानाधारक रिक्षा आणि टॅक्सीचालकांसाठी मराठी भाषा बोलणे सक्तीची करण्याचा निर्णय परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतल्यानंतर विरोधाचे आवाज येऊ लागले आहेत. मराठी लिहिता आणि वाचता न येणाऱ्या तसेच मराठी भाषेचे ज्ञान नसलेल्या चालकांचे परवाने रद्द केले जातील, असा इशारा मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला आहे. खरं तर ही भूमिका राज्य सरकारने यापूर्वीच घ्यायला हवी होती. मात्र, परिवहनमंत्री सरनाईक यांच्या भूमिकेनंतर त्यांना खलनायक ठरवून विरोधाची भूमिका घेण्याचे काम केले जात आहे. याला पहिला विरोध मंत्री गणेश नाईक यांनी केला. तात्काळ कारवाईऐवजी मराठी शिकण्यासाठी वेळ देण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. महाराष्ट्रात मराठी भाषेसाठी अशी लाचार भूमिका मंत्र्यांना का घ्यावी लागते, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. खरं तर शशांक राव आणि गुणरत्न सदावर्ते यांनी मराठी भाषा सक्तीला विरोध करण्याऐवजी रिक्षा-टॅक्सीचालकांना मराठी शिकण्याचे आवाहन यापूर्वीच केले असते तर बरे झाले असते. सदावर्ते यांनी तर भाषा हा संवादाचा विषय असून, ती दडपशाहीचे साधन बनवणे संविधानाच्या तत्त्वांना बाधक असल्याचे म्हटले आहे. मात्र, त्यांची हीच भूमिका ते इतर राज्यांमध्ये का मांडत नाहीत? मुळात महाराष्ट्रात मराठी बोलणे, शिकणे गुन्हा असल्यासारखे का मानले जाते? त्याहून गंभीर बाब म्हणजे मराठी भाषा सक्तीची करण्याचा निर्णय घ्यावा लागतो, ही सरकारसाठी लाजिरवाणी बाब नाही का, याचाही विचार व्हायला हवा!

आता परिवहन खात्याने हा निर्णय घेतला म्हणजे सरकारी निर्णय आहे. तर राज्य सरकारने म्हणजेच मुख्यमंत्र्यांनी ठामपणे त्यांच्या पाठीशी उभे राहायला हवे. मात्र, शशांक राव यांनी 4 मेपासून मराठीविरोधात राज्यात निदर्शने करण्याचा इशारा देऊनही मुख्यमंत्र्यांनी मौन बाळगले आहे. याचा अर्थ काय काढायचा? परिवहन मंत्र्यांच्या निर्णयासोबत मुख्यमंत्री आहेत का? की मतांसाठी परराज्यांतून आलेल्यांची लाचारी हेच धोरण राहणार आहे.

गेल्या वर्षी मराठीवरून असाच वाद झाला होता. त्यावेळी भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांनी अकलेचे तारे तोडले होते. महाराष्ट्रात कोणतेही उद्योग-फॅक्टरी नाही. तुम्ही कोणता कर भरता? तुम्ही आमच्या पैशांवर जगत आहात? आमच्या पैशांतून खात आहात, असे बोल महाराष्ट्राला आणि मराठी माणसाला ऐकवले होते. या वक्तव्यामुळे महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली होती. मात्र, महाराष्ट्राचा खुलेआम अपमान करणाऱ्या दुबेंना ना पंतप्रधानांनी सुनावले ना राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी चपराक लगावली. खरं तर महाराष्ट्र किती कर भरतो, याची आकडेवारी मुख्यमंत्र्यांनी दुबे यांच्या तोंडावर फेकणे अपेक्षित होते. मात्र, भाजपचा खासदार बोलतो म्हटल्यावर मुख्यमंत्र्यांनी अळीमिळी गुपचिळीचे धोरण स्वीकारले. आताही शशांक राव आणि गुणरत्न सदावर्ते यांना मुख्यमंत्र्यांनी कडक बोल सुनावण्याची गरज होती. मात्र, मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिला म्हणून मिरवून घेण्यातच सरकार धन्यता मानते. वास्तविक अभिजात भाषेचा दर्जा 2014 मध्येच मिळायला हवा होता. तो एक तप उशिरा आणि तोही 2024 मध्ये विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर देण्यात आला. मराठीचा पुळका फक्त जाहीर भाषणात आणि वेळ आल्यानंतर मतांची बेगमी करण्यापुरताच मर्यादित राहिला आहे. आताही मराठीच्या मुद्द्यावरून केवळ महाराष्ट्र नवनिर्माण सेना हा एकच राजकीय पक्ष आक्रमक झाला आहे. वास्तविक मराठीच्या मुद्द्यावरून सर्व राजकीय पक्षांनी मतभेद विसरून एक व्हायला हवे होते. जसे दक्षिणेकडील राज्यांमध्ये होत असते. मात्र, हिंदी मतांची लाचारी इथल्या बहुतांश राजकीय पक्षांना सोडवत नाही. म्हणूनच आता मराठी भाषिकांनीही राजकीय उपरणे बाजूला ठेवून मराठी भाषेच्या समर्थनार्थ पेटून उठण्याची गरज आहे. अभिनेता जितेंद्र जोशी यांनी नुकताच स्वरचित कवितेचा मुखडा सादर केला. 'साद घालते माय मराठी तेथेची धन्य झालो, गत जन्मीचं पुण्य म्हणून महाराष्ट्र देशी जन्माला आलो' ही जाणीव प्रत्येक मराठी माणसात असायलाच हवी. त्यामुळे जे कुणी मराठी भाषेला विरोध करतील, त्यांना मराठी बोलण्याचा आग्रह धरायला हवा. अन्यथा, त्यांना जिथून आलात तिकडे आपल्या रिक्षा-टॅक्सी घेऊन जायचा रस्ता दाखवायला हवा.

# मराठी बोलायची कोणी?





**अभिजात भाषेचा मान मिळवूनही आज मराठी आपल्याच घरात पोरकी होतेय की काय, अशी भीती वाटू लागली आहे. रिक्षा-टॅक्सीचालकांनी मराठी बोललं पाहिजे ही मागणी कायदेशीररीत्या योग्यच आहे, पण जेव्हा दोन मराठी माणसं एकमेकांशी हिंदीत संवाद सुरू करतात, तेव्हा त्या मागणीतील धार कमी होते.'**

राज्यातील रिक्षा आणि टॅक्सीचालकांसाठी एक मेपासून केलेला मराठी सक्तीचा निर्णय सध्या मत-मतांतरांनी गाजतो आहे. या निर्णयाला कायदेशीर आधार असल्याने त्याला थेट विरोध करणं कोणालाही अडचणीचंच आहे. त्यामुळे, वेगवेगळी खुस्पटं काढून त्यात खोडा घालण्याचा प्रयत्न सुरू आहे. राजकीय पक्षांमध्ये या निर्णयाला विरोध शिवसेनेतूनच झाला आहे. शिवसेनेतील अमराठी, उत्तर भारतीय नेते संजय निरुपम यांना प्रकाशझोतात येण्यासाठी हे चांगलं निमित्त मिळालं. यात दोन गंमती आहेत. मूळ निर्णय परिवहन विभागाचा आहे. त्याचे मंत्री प्रताप सरनाईक हे शिवसेनेचे नेते आहेत. त्यांच्या निर्णयाला विरोध करण्यासाठी उभे राहिलेले पहिले नेते निरुपमही त्याच पक्षाचे आहेत!

निरुपम मूळ पत्रकार. ते मुंबईत राजकीय क्षितिजावर उगवले ते पूर्वीच्या, म्हणजे मूळ शिवसेनेतून. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे असतानाच. दोन वेळा खासदारकी झाल्यानंतर ते काँग्रेसवासी झाले. तिथून पुन्हा विभाजित शिवसेनेच्या, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटात सामील झाले. सरनाईक यांच्या निर्णयाला विरोध करण्यासाठी त्यांनी काल दहिसर गाठलं. तिथे त्यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या सैनिकांशी गाठ पडली. त्यातून जो गोंधळ व्हायचा, तो झाला. रिक्षा-टॅक्सीचालकांसाठी मराठीसक्तीचा मुद्दा त्यामुळे वादाचा झाला. मनसेने आता साहजिकच त्यात पुढाकार घेतला आहे. 'महाराष्ट्रात मराठीचं भवितव्य' हा चिंतेचा विषय आजचा नाही. दशकानुदशके या विषयावर चर्वितचरण सुरू आहे. मराठीची पीछेहाटही अव्याहत सुरू आहे!! दरम्यानच्या काळात मोठा जोर लाऊन, राजकीय परिस्थितीचा फायदा उठवून महाराष्ट्राने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळवला. हा दर्जा देणं केंद्राचं काम होतं. महाराष्ट्राच्या सरकारने ते केंद्राला करायला लावलं. पण, हा दर्जा मिळाल्यानंतर मराठीसाठी काही भरीव करायला हवं होतं ना? दोन-चार संशोधन प्रकल्प तरी सुरू व्हायला हवे होते. निदान मुंबईतल्या 'मराठी भाषा भावना'चं काय? हा प्रश्न विचारायला हवा होता. ते कोणी केलं का? आपली भाषा दुसऱ्याच्या माथी मारून त्यातून मातृभाषेचा विकास होईल, हा समज खरोखरच अजब आहे!

भाषावार प्रांतरचनेच्या मूळ उद्देशाला धरून प्रत्येक प्रांतात तिथल्या राज्य भाषेचा वापर आणि विकास झाला पाहिजे, यात कोणाचंच दुमत नाही. कोणी याला विरोध करत असेल, तर त्याला तिथल्या तिथे या देशाच्या रचनेची जाणीव करून दिली पाहिजे. पण, आपली राज्यभाषा, आपली मातृभाषा जपण्याची, तिची प्रतिष्ठा वाढवण्याची, तिच्यात वेळोवेळी भर घालण्याची जबाबदारी त्या त्या भाषिक समूहांची असते. महाराष्ट्रात ही जबाबदारी मराठी भाषकांची आहे. त्यांनी व्यवहारात मराठी वापरली, तरच अन्य भाषकही आपसूक मराठी वापरतील. मराठी वापराची ही सुरुवात मराठी माणसानेच करायला हवी. ती त्याची जबाबदारी आहे. परप्रांतीय, अमराठी भाषकांची नाही. मुंबई ही साऱ्या देशाचं पोट भरणारी नगरी असल्याने इथे संपूर्ण देशातून लोक येत राहतात. वर्षानुवर्षे हे सुरू आहे. त्यामुळे, अन्य प्रांतातून मुंबईत येऊन स्थायिक झालेल्यांच्याही आता तीन - चार पिढ्या इथे नांदल्या आहेत. कायदेशीर भाषेत तेही 'महाराष्ट्रीय'च आहेत. तरीही अशा कुटुंबातल्या अनेकांना व्यवहारापुरतीही नीट मराठी येत नाही, हा दोष कुणाचा? त्यात त्यांचा वाटा तर आहेच; पण त्याहीपेक्षा अधिक त्यांना मराठी बोलणं, मराठी भाषेतून व्यवहार करणं अपरिहार्य न करणाऱ्या इथल्या स्थानिकांचा; म्हणजे मराठी माणसांचा आहे. बॉलिवूडचं केंद्र मुंबई असल्याने म्हणा, देशाची आर्थिक राजधानी ठरल्याने म्हणा, मराठी आणि हिंदीची लिपी एक असल्याने म्हणा, मराठी माणसाच्या न्यूनगंड म्हणा, की अतिभिडस्त स्वभाव म्हणा; पण मराठी माणूस मुंबईत सार्वजनिक ठिकाणी आपोआप हिंदी भाषेत शिरतो, हे ढळढळीत सत्य आहे. लोकल ट्रेनमध्ये सर्व अन्य भाषक आपल्या स्नेह्यांशी फोनवर किंवा अगदी आपसातही तारस्वरात मातृभाषेत बोलतात. सर्रास दिसणाऱ्या या दृश्यात मराठी माणूस तसा बोलताना कधी दिसतो का? दोन अनोळखी मराठी माणसंही आपला संवाद बहुतेकदा हिंदी किंवा इंग्रजीतूनच सुरू करतात. हा दोष कुणाचा? सेमी इंग्लिशचा पुरस्कार करूनही मराठी पालक आपल्या मुलांना शुद्ध इंग्रजी शाळेत घालण्यासाठी जीवाचा आटापिटा करतात. का? कारण, त्यांच्या नेत्यांची, साहित्यिकांची, अभिजात वर्गातली मुलं त्याच शाळेत शिकतात. मराठीतली नवी पिढी मराठीपासून अशी तुटली आहे, हे खरं ना? सामान्य मराठी माणसाने मराठी सण-उत्सव जिवंत ठेवण्याची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली आहे. आता मराठी भाषा जगवण्याची जबाबदारीही त्यानेच घ्यायला हवी का? ते होत नाही, म्हणून भाषा जगवण्यासाठी तिचा असा विस्तार करायचा आहे का?

मुळात वाहनचालक ज्या राज्यात परवाना घेत असेल, त्या राज्याची भाषा किमान स्वरूपात त्याला यायलाच हवी, असा नियम आहे. महाराष्ट्रात २०११ मध्येच त्याचा अंतर्भाव झाला आहे. त्याची कडक, अनिवार्य अंमलबजावणी व्हावी यासाठी सरकारने आता भूमिका घेतली आहे आणि ती योग्यच आहे. मध्य मुंबईतले अमराठी दुकानदार चांगली मराठी बोलतात. कारण, ती त्यांची व्यावसायिक गरज आहे. सर्व मराठीबहुल भागात हा अनुभव येईल. मुंबईने मराठी बोलावं असं वाटत असेल, तर मुंबईच्या वातावरणात मराठी पाहिजे. कानावर सतत मराठी पडली पाहिजे. परप्रांतीय टॅक्सी आणि रिक्षाचालक इथे निव्वळ पोट भरायला आले आहेत. मराठीचा दुःस्वास करायला नाही. पोट भरण्यासाठी, व्यवसायासाठी जे आवश्यक, ते ते करतीलच. मराठीही बोलतील. अट एकच आहे, मराठी माणसाने त्याच्याशी मराठीत बोललं पाहिजे. दुसऱ्यावर सक्ती करण्यापूर्वी आपण आपल्यावरच ही सक्ती करायला हवी. तसं केलं तर, ना शासन निर्णयाची गरज भासेल, ना कुठल्या अटी - शर्तींची, ना आंदोलनाची!




# गुडघेदुखी व हाडांतील वेदना १ रात्रीत होतील गायब

हवामानात बदल झाला की हळूहळू धोकाही वाढू लागतो. खास करून सर्वात जास्त समस्या त्या लोकांना होते जे सांधेदुखी, गुडघेदुखी किंवा जुन्या दुखापतीने त्रस्त असतात. आता हिवाळा संपत असून उन्हाळा सुरू होणार आहे. तर उन्हाळ्याच्या या हंगामात वेदना अधिक तीव्र होतात आणि सहसा स्नायू व सांध्यांचे दुखणे पुढे येते. स्नायुंच्या वेदना बहुतेकदा छाती, पोट, पाठ आणि हातपायांवर परिणाम करतात. तर सांधेदुखी अनेकदा खांदे, कोपर, मनगट, बोटे, गुडघे आणि घोट्यावर परिणाम करते. स्नायू आणि सांधेदुखीवर अनेक वैद्यकीय उपचार आहेत जसे की विश्रांती घेणे, फिजिओथेरपी, वेदना कमी करणारी औषधे आणि हॉट पॅक. पण कधी कधी यातूनही आराम मिळत नाही. त्यामुळेच यावर काही ठोस उपाय माहित असणे महत्त्वाचे आहे. तशा तर वेदना काही दिवसात दूर पाळून जातात पण वेळा रुग्णांना पूर्ण वेदनामुक्त होण्यास वेळ लागू शकतो. जर तुम्हाला या दुखण्यापासून लवकर सुटका हवी असेल तर हा लेख नक्की वाचा. कारण यात नॉएडा के ई-260 सेक्टर २७ येथील कपिल त्यागी आयुर्वेद क्लिनिकचे डायरेक्टर डॉक्टर कपिल त्यागी यांनी या समस्येवर काही आयुर्वेदिक उपाय सांगितले आहेत.

- **स्नायू आणि सांध्यांच्या वेदनांसाठी आयुर्वेदिक तेल :** डॉक्टरांच्या मते, सांधे किंवा स्नायूदुखी ही एक सामान्य समस्या आहे ज्याचा त्रास केवळ वृद्धच नाही तर लहान मुले आणि तरुणांनाही होतो. जास्त वेळ बसणे, चुकीचा आहार, जुनी दुखापत, हवामानातील बदल इत्यादी कारणांमुळे ही समस्या उद्भवू शकते. आयुवेर्दात सांधे आणि स्नायूंच्या वेदनांसाठी अनेक तेलांचे उपाय सांगितलेले आहेत जे खूप प्रभावी आणि स्वस्त आहेत.
- **तिळाचे तेल :** डॉक्टरांनी सांगितले की सांधेदुखीसाठी बाजारात उपलब्ध असलेले बाम, तेल किंवा औषधे तुमच्यासाठी महागडी ठरू शकतात आणि त्यांच्या सततच्या वापरामुळे तुम्हाला अनेक दुष्परिणामांना सामोरे जावे लागू शकते. अशा परिस्थितीत तिळाचे तेल तुमच्यासाठी स्वस्त आणि प्रभावी उपचार ठरू शकते. यासाठी तिळाच्या तेलात ६ ते १२ ग्रॅम रसोन कंद शिजवल्यानंतर ते थंड करून ठेवावे. हे मिश्रण दिवसातून दोनदा लावा. यामुळे रात्री झोपताना सांधेदुखीपासून आराम मिळेल.
- **नारायण तेल :** सांधे आणि स्नायूंच्या दुखण्यावर नारायण तेल हा रामबाण उपाय आहे. जर तुम्हाला वेदनांपासून स्वस्तात आराम मिळवायचा असेल तर हा उपाय तुमच्यासाठी उत्तम आहे. यासाठी बाला तेल आणि नारायण तेल समान प्रमाणात मिसळून कोमट करा. रात्री झोपताना बाधित भागावर लावा आणि मसाज केल्याने तुम्हाला त्वरित आराम मिळेल.
- **एरंडेल तेल :** एरंडेल तेल हे आयुवेर्दात एक उत्तम औषध मानले गेले आहे. दुखण्यापासून आराम मिळण्यासाठी १४ मिली एरंडेल तेलात एक ग्रॅम लहान पिंपळे टाकून मंद आचेवर शिजवा. रात्री झोपताना हे मिश्रण दुखणाऱ्या जागेवर लावल्याने आराम मिळेल.
- **तिळाच्या तेलात लसूण :** तिळाचे तेल कोणत्याही प्रकारच्या वेदनांवर स्वस्त आणि प्रभावी उपाय आहे. त्याचा प्रभाव वाढवण्यासाठी त्यात कोरडे आले आणि लसूण घालून चांगले शिजवा. रात्री झोपताना या मिश्रणाने प्रभावित भागाला मसाज करा. तुम्हाला निश्चित विश्रांती मिळेल.
- **एरंडेलची पाने :** एरंडेल तेलाप्रमाणे, त्याची पाने देखील वेदनाशामक म्हणून काम करतात. यासाठी एरंडेलंची पाने तेलात टाकून मंद आचेवर गरम करून दुखत असलेल्या ठिकाणी बांधून ठेवा. यानंतर, हलक्या हाताने शेक द्या. सकाळी तुमचा त्रास नाहीसा होईल.
- **नारळ तेल :** खोबरेल तेलाचे अनेक फायदे आहेत आणि आयुवेर्दात ते एक उत्तम औषध मानले गेले आहे. सांधे आणि स्नायू दुखण्यापासून आराम मिळवण्यासाठी, हे तेलं हलके गरम करा आणि त्यात थोडा कापूर आणि कोरडे आले घाला. हे तेल गुडघ्यांवर मसाज केल्याने लवकर आराम मिळेल.

# मजबूत आणि चमकदार केसांसाठी करा कांद्याच्या रसाचा असा वापर





आपण सर्वात जास्त काळजी करतो ती आपल्या त्वचा आणि केसांची. केसांची काळजी घेण्यासाठी बरेचदा पार्लरला जाणं, केसांना जपणं हे सर्वच केलं जातं. पण तुम्हाला माहीत आहे का? कांद्याचा वापर करून तुम्ही केस अधिक मजबूत आणि चमकदार करू शकता. त्यासाठी तुम्हाला फक्त काही स्टेप्स फॉलो करायच्या आहेत आणि त्या आम्ही तुम्हाला या लेखातून सांगणार आहोत. सध्या केराटिन, स्टॅनिन अनेक पद्धती केसांना चमकदार ठेवण्यासाठी वापरल्या जातात. पण स्टॅनिनमध्ये सर्वात जास्त वापर हा कांद्याचा केला जातो याची तुम्हाला कल्पना आहे का? पण आता पार्लरमध्ये अधिक खर्च न करता आणि तुम्ही घरच्या घरी केसांची काळजी घेण्यासाठी हा उत्तम उपाय नक्कीच ट्राय करू शकता. यामुळे तुमचे केस अधिक मजूबत आणि चमकदार होतील याची आम्हाला खात्री आहे. पाहूया नक्की कोणत्या स्टेप्स फॉलो केल्या की तुम्हाला अप्रतिम केस मिळतील.

### कसा वापरावा कांद्याचा रस

- स्टेप १ - सर्वात पहिले कांदा घेऊन त्याचे बाहेरील साल काढून टाका आणि त्याचे तुकडे करून घ्या. अगदी बारीक तुकडे करायची गरज नाही
- स्टेप २ - कापलेल्या कांद्याचे तुकडे ब्लेंडरमध्ये घाला आणि व्यवस्थित ब्लेंड करा, याची बारीक पेस्ट करून घ्या
- स्टेप ३ - यानंतर ही पेस्ट एका स्वच्छ कपड्यावर काढा आणि यातील सर्व पाणी काढून घ्या. पेस्टमधून आलेलं सर्व पाणी एका बाऊलमध्ये काढून घ्या
- स्टेप ४ - हे पाणी आपल्या नियमित हेअर ऑईलमध्ये नीट मिक्स करून घ्या. तुम्ही जे हेअर ऑईल नेहमी वापरता त्यामध्येच हे पाणी मिक्स करा. इतर तेलाचा वापर करू नका.
- स्टेप ५ - यानंतर तेल आणि कांद्याच्या रसाचं हे मिश्रण तुम्ही केसांना आपल्या मुळांपासून लावायला सुरूवात करा. हळूहळू केसांची आणि स्काल्पचीही व्यवस्थित मालिश करून घ्या
- स्टेप ६ - हे मिश्रण केसांना नीट लावल्यानंतर साधारण ३५-४० मिनिट्सने शँपू केसाला लावून केस धुवा. ही अशी संपूर्ण प्रक्रिया तुम्ही आठवड्यातून कमीत कमी दोन वेळा करा. काही आठवड्यातच तुम्हाला याचा परिणाम दिसू लागेल.

### कांद्याच्या रसाचा इतर वस्तूंबरोबर केसांसाठी वापर

कांद्याच्या रसाचा इतर वस्तूंबरोबरही तुम्हाला केसांच्या मजबूतीसाठी उपयोग करता येतो. पाहूया कोणत्या इतर वस्तूंचा वापर करता येऊ शकतो.

घरगुती उपायांनी मिळवा सुंदर केस

- **कांदा आणि बिअर :** बिअरदेखील केसांसाठी चांगली असते असं म्हटलं जातं. बिअरने केसांना नैसर्गिकरित्या चमक मिळते. कांद्याच्या रसामध्ये बिअर मिक्स करून केसांना लावल्यास, केसांना चांगले कंडिशनिंग मिळते आणि केस मऊ होतात. हा उपाय तुम्ही आठवड्यातून दोन वेळा करू शकता.
- **कांदा आणि मध :** केसांची वाढ चांगली व्हावी आणि चमक चांगली राहावी यासाठी हा उत्तम उपाय आहे. कांद्याची पेस्ट घेऊन त्यात मध मिसळावा. ही पेस्ट तुम्ही केस कमी असलेल्या जागी लावल्यास, केस दाट होण्यास मदत मिळते.
- **कांदा आणि अंडं :** अंडेही केसांसाठी खूपच चांगले मानले जाते. अंड्याचा पांढरा भाग आणि कांद्याचा रस मिक्स करून घ्या. हे मिश्रण केसांना अर्धा तास लावून ठेवा आणि नंतर केस शँपूने धुवा.


### केसांना कांदा लावण्याचा फायदा


कांद्याचा रस हा केस लवकर वाढण्यासाठी अथवा केवळ केस मजबूत राहावे म्हणून होत नाही तर याचा अनेक तऱ्हेचा फायदा होतो. कांद्यामध्ये पोटॅशियम, विटामिन ए, सी आणि ई यांचा चांगला स्रोत आहे. त्यामुळे केस पुन्हा येण्यासाठीही याचा फायदा होतो. तसंच केमिकलयुक्त उपचारांनी केसांना अधिक हानी पोहचते. कांदा हा नैसर्गिक ऑक्सिडंट आहे. त्यामुळे केसांना चमकदार ठेवण्यासाठी याचा उपयोग होतो. केसांना नैसर्गिक चमक देण्यासाठी याचा फायदा होतो. त्यामुळे तुम्हीही कांद्याच्या रसाचा असा वापर करून मजबूत आणि चमकदार केस मिळवू शकता. तुम्हाला जास्त खर्च करण्याचीही गरज भासणार नाही आणि हा उपाय घरच्या घरीही करता येईल.

# अगदी आठवडाभरात असे कमी करा मांडी आणि नितंबावरील फॅट

हल्ली अनेक जण फिगरबाबत फारच जागरुक झाले आहेत. जीम, योगा, पिलाटेस असे सगळे काम सांभाळून करण्याचा सपाटा अनेकांनी लावला आहे. आता प्रत्येकाच्या परफेक्ट बॉडीची defination ही वेगळी असते. म्हणजे काहींना त्यांचे ठराविक भागच कमी करायचे असतात. म्हणजे काहींना त्यांचे दंड बाहुबलीप्रमाणे बलदंड वाटतात. ते कमी करण्यासाठी त्यांची धडपड सुरु असते. काहींना पोट, काहींना कंबर, फेसफॅट, थाईज, नितंब... असं बरचं काही कमी करायचं असतं.

शरीवरील फॅट कमी करत असताना सगळ्यात जास्त त्रासदायक ठरतात ते मांडी आणि नितंबावरील फॅट. तुमच्याही मांड्या आणि नितंबाचा आकार शरीराच्या तुलनेत अधिक आहे तर मग तुम्ही या सोप्या टीप्सने आठवडाभरात तुमचे फॅट कमी करु शकता.






- **स्कॉट्स :** तुम्हाला पहिल्यांदा स्कॉट्स हा व्यायाम करायचा आहे. तुम्हाला गुडघे समांतर ठेवून खाली बसायचे आहे. खूर्चीवर बसतात तसे तुम्हाला बसायचे आहे. पण हे करताना तुमचा गुडघा तुमच्या पायाच्या पुढे जायला नको. असे करताना तुमच्या मांड्या आणि नितंबावर ताण येईल. साधारण १० पासून तुम्ही स्कॉट्स करायला सुरुवात करा. स्कॉटस करताना तुम्हाला थोडा पाय दुखल्यासारखे वाटेल. पण तुम्हाला किमान १० वेळा तरी असे करायचे आहे. त्यानंतर तुम्ही यामध्ये वाढ करायला काहीच हरकत नाही.
- **जम्पिंग जॅक्स :** दोन्ही हातांची टाळी देऊन आणि दोन्ही पाय लांब करुन तुम्हाला हा व्यायाम करायचा असतो. तुम्ही ही क्रिया वारंवार करायची आहे. किमान १० उड्यांपासून तुम्ही याची सुरुवात करा. नंतर तुम्ही उड्या वाढवू शकता. हे केल्यावर तुम्हाला थोडा थकवा येईल.
- **हाय हिल्स :** पाय जितके वर उंचावता येईल तितके उंचावून तुम्हाला हा व्यायाम प्रकार करायचा आहे. असे करताना तुम्हाला तुमच्या मांड्यांचाव वरील भाग दुखेल असा वाटेल. पण ठिक आहे किमान ३० सेकंद तर तुम्ही हे करायला हवे. तरच याचा फायदा तुम्हाला होईल.
- **बट ब्रीज :** पाठीवर झोपून तुम्हाला तुमचे नितंब वर उचलायचे आहेत. अगदी सेकंभरासाठी तुम्हाला तुमचे शरीर उचलून धरायचे आहे. असे तुम्हाला करायचे आहे. हे करत असताना तुम्हाला तुमच्या नितंबावर थोडा ताण जाणवेल. त्याचा फायदा तुम्हाला तुमचे नितंबावरील फॅट कमी करण्यास मदत करेल.
- **सीझर्स :** पाय हवेत वर करुन तुम्हाला कात्री प्रमाणे त्याची हालचाल करायची आहे. जर तुम्ही काऊंटीगवर ते करणार असाल तर किमान २० वेळा तरी असे करा आणि जर तुम्ही घड्याळ लावून करणार असाल तर किमान ३० सेकंद तरी करा. तुमच्या इनर थायमधील फॅट कमी होण्यास मदत होईल.



### आठवडाभराच्या चॅलेंजसाठी व्हा सज्ज

आता तुम्हाला काही तरी कमी करायचे आहे. म्हणजे तुम्हाला काही नियमांचे पालन नक्कीच करावे लागेल. सात दिवस तुमच्या शरीरात जास्तीत जास्त फळ जाऊ द्या. कमीत कमी साखर आणि गोड पदार्थ ठेवा. जर तुम्हाला डाइएट करणे शक्य नसेल तरी ठिक आहे.तुम्ही तुमचा आहार चौकस ठेवा. वेळेवर नाश्ता आणि जेवण असू दया. रात्री खूप उशीरा जेवू नका.





# स्मरणशक्ती वाढवण्यासाठी उपाय नक्की करुन पाहा

अगदी कितीही जुने दाखले, हिशोब, गणितं त्यांना अगदी तोंडपाठ असायची. पण आता मात्र लोकांना मोबाईल फोन घेतल्याशिवाय काही आठवणार नाही. सगळ्या गोष्टी एका क्लिकवर करायची सवय लागली आहे. पण समजा काही कारणास्तव तुमच्याकडे मोबाईल फोन नसेल. अशावेळी मात्र तुम्हाला तुमच्या बुद्धीवर जोर द्यावा लागेल की नाही. म्हणूच आज आपण स्मरणशक्ती वाढवण्यावर थोडी अधिक माहिती घेणार आहोत यामध्ये आपण स्मरणशक्ती वाढवण्याचे उपाय, स्मरणशक्ती वाढवण्यासाठी आहार, स्मरणशक्ती वाढवण्याचे तंत्र, स्मरणशक्ती वाढवण्यासाठी योगासने, स्मरणशक्ती वाढवण्यासाठी आयुर्वेदीक उपचार, लक्षात ठेवण्याचे उपाय.. शिवाय केलेला अभ्यास लक्षात राहत नाही अशांसाठी काही सोप्या गोष्टी आणि बुद्धी कशी वाढवावी या विषयी अधिक माहिती घेणार आहोत मग करुया सुरुवात

### स्मरणशक्ती वाढवण्यासाठी योगासने

- **सर्वांगासन :** स्मरणशक्ती वाढवण्यासाठी सगळ्यात पहिलं आसन आपण पाहणार आहोत ते सर्वांगासन. सर्वांगासनामध्ये तुमचे दोन्ही पाय हवेत वर करायचे असतात. असे करताना तुम्हाला कमरेकडून आधार द्यायचा असतो. या आसनामुळे तुमच्या मेंदूला योग्य तो रक्तपुरवठा होतो. मेंदूला झालेल्या योग्य रक्तपुरवठ्यामुळे तुमचा मेंदू कार्यरत राहतो. त्यामुळे याचा फायदा तुम्हाला स्मरणशक्ती वाढवण्यासाठी होतो.
- **भुजंगासन :** भुजंगासनामध्ये तुम्हाला सापाप्रमाणे मान मागे करायची असते म्हणूनच याला ङ्कुं स्त्रङ्गरी असे सुद्धा म्हणतात. तुम्हाला पोटावर झोपून हाताच्या मदतीने अंग उचलायचे आहे. असे करताना तुम्हाला तुमचे डोके पाठीच्या दिशेने झुकवायचे आहे असे करताना तुम्हाला या आसनामध्ये काही किमान १ मिनिटं तरी तसेच राहायचे आहे. यामुळे तुमच्या मज्जासंस्थेला चालना मिळते आणि त्याचा परीणाम तुमच्या मेंदूवर होतो. योग्य प्रमाणात रक्तपुरवठा झाल्यामुळे तुमची बुद्धी तल्लख राहते.
- **पद्महस्तासन :** पद्महस्तासन हा व्यायामप्रकारसुद्धा तुमच्या स्मरणशक्ती वाढवण्यासाठी चांगला आहे. तुम्हाला सरळ उभं राहून हात वर करुन तसेच कंबरेतून वाकत खाली यायचे आहे. असे करताना तुम्हाला जमिनीला हात टेकवता यायला हवा. शिवाय गुडघ्यात न वाकता तुम्हाला तुमचे डोकं तुम्हाला गुडघ्याला टेकवण्याचा प्रयत्न करायचा आहे. या आसनामुळे तुमच्या मज्जासंस्थेवर ताण पडतो. शिवाय तुमच्या मेंदूला योग्य असा रक्तपुरवठा होतो. स्मरणशक्ती वाढवण्याचे उपाय करत असताना तुम्ही हे आसन करू शकता.
- **हलासन :** हलासनामध्ये तुम्हाला पाठीवर झोपायचे असते. पाय हवेत उचलून तुम्हाला ते तुमच्या डोक्यापर्यंत आणायचे असतात असे करत असताना तुमच्या मेंदूपर्यंत रक्तपुरवठा होतो. तुमच्या पाठीच्या कण्यासोबतच तुम्हाला मेंदूचे कार्य सुरळीत होण्यासाठी मदत होते. त्यामुळे तुम्ही हलासन करु शकता.
- **पद्मासन :** स्मरणशक्ती चांगली राहण्यासाठी आणखी एक सोपं आसन तुम्ही करु शकता ते म्हणजे पद्मासन . पद्मासनामुळे तुमचे मन शांत होते. मन शांत झाल्यामुळे तुमच्या मेंदूवरील ताण कमी होतो. ताण कमी झाल्यामुळे तुमचं डोकं शांत राहतं. त्यामुळे तुम्ही पद्मासन अगदी घरच्या घरी आणि कधीही करु शकता. पद्मासन करत असताना तुम्ही ओमकार म्हटला तरी चालू शकेल.



### स्मरणशक्ती वाढवण्यासाठी आहार

- **मासे :** माशांमध्ये असणारे फिश ऑईल तुमच्या शरीरासाठी चांगले असते. माशांच्या सेवनामुळे तुम्हाला अनेक फायदे होतात. त्यामुळे तुम्ही तुमच्या आहारात याचा समावेश अगदी हमखास करायला हवा.
- **सॅच्युरेटेड फॅट:** दूध,मांस, चिकन, तेल, चीझ यामध्ये सॅच्युरेटेड फॅट असते. तुमच्या आरोग्यासाठी या गोष्टी अतिरिक्त खाणे चांगले नाही.असे सांगितले जाते. पण एका अभ्यासात असे समोर आले आहे की या पदार्थांच्या योग्य सेवनामुळे तुम्हाला स्मरणशक्ती वाढवण्यासाठी फायदा होऊ शकतो.
- **पालेभाज्या:** पालेभाज्याही तुमच्या शरीराला ॲक्टीव्ह ठेवण्याचे काम करते. व्हिटॅमिन, ल्युटेन, फ्लोलेट असते जे तुमच्या स्मरणशक्तीसाठी चांगले असते. त्यामुळे तुम्ही तुमच्या आहारात मेथी, पालक, मुळा, लालमाठ अशा भाज्यांचे सेवन करायला हवे
- **ग्रीन टी:** चहा पिण्यापेक्षा जर तुम्ही ग्रीन टी चे सेवन केले तर तुम्हाला त्याचा नक्कीच फायदा होऊ शकेल. म्हणून तुम्ही ग्रीन टीचे सेवन करा. ग्रीन टी तुम्हाला कायम ॲक्टीव्ह ठेवते. त्यामुळे तुम्ही अधिक कार्यक्षम राहता आणि तुमच्यामध्ये अधिक चुणूक दिसून येते. स्मरणशक्ती वाढवण्याचे उपाय करणं अतिशय सोपे आहे.
- **डार्क चॉकलेट :** चॉकलेट हे नेहमीच शरीरासाठी चांगले असते. तुम्ही जर डार्क चॉकलेट खाल तर तुम्हाला त्याचे फायदे नक्कीच जाणवतील. डार्क चॉकलेटच्या सेवनामुळे तुमच्यावरील अतिरिक्त ताण कमी होतो आणि तुमच्या बुद्धीला चालना मिळते.
- **फिश सप्लिमेंट :** जर तुम्ही आहारात मासे खाऊ शकत नसाल तर तुम्ही योग्य सल्ला घेऊन फिश सप्लिमेंट घेऊ शकता. याचा फायदा तुम्हाला होऊ शकतो. तुमच्या बुद्धीला चालना देण्याचे काम फिश सप्लिमेंट करु शकतात. त्यामुळे तुम्ही योग्य सल्ला घेऊन फिश सप्लिमेंट घेतात.
- **कोकोओचा करा वापर :** चॉकलेटमध्ये असलेले कोकोआदेखील तुमच्या स्मरणशक्तीसाठी चांगले असते.मेंदूला योग्य रक्तपुरवठा करण्यासाठी कोकोआ चांगले आहे. त्यामुळे तुम्ही अगदी हमखास कोकोआ खा. कारण त्याचा तुम्हाला योग्य तो फायदा होऊ शकेल. हल्ली बाजारात कोकोरआची पावडर मिळते. ज्याचा उपयोग तुम्ही करु शकता.

### स्मरणशक्ती वाढवण्यासाठी आयुर्वेदिक उपचार

- **अश्वगंधा :** अश्वगंधाचे अनेक आरोग्यदायी फायदे आहेत. त्यापैकीच स्मरणशक्तीवर होणारा अश्वगंधाचा परिणाम हा वाखाणण्यासारखा आहे. अश्वगंधाची मुळे औषधांप्रमाणे घेतल्याने तुम्हाला फायदे होतात. अभ्यासातूनही हे समोर आले आहे. तुमच्या मेंदूला योग्य रक्तपुरवठा करण्याचे काम अश्वगंधा करते.
- **ब्राम्ही :** अश्वगंधाप्रमाणे ब्राम्हीही तुमच्या मेंदूला ॲक्टीव्ह ठेवण्याचे काम करते. अनेकदा मन शांत होण्यासाठी ब्राम्ही घेण्याचा सल्ला दिला जातो. अल्झायमर सारख्या आजारांपासून ब्राम्ही तुम्हाला दूर ठेवते. मेंदूला चालना देण्याचे काम ब्राम्ही करते. त्यामुळे तुम्ही योग्य प्रमाणात ब्राम्हीचे सेवन करु शकता.
- **शंखपुष्पी :** आयुवेर्दात शंखपुष्पीचे अनेक फायदे सांगितले आहेत. बुद्धीसाठी शंखपुष्पी चांगले असल्याचे पुराणात सुद्धा म्हटले आहे. शंखपुष्पीच्या सेवनामुळे तुमची बुद्धी तल्लख राहते आणि तुम्हाला त्याचा फायदा होतो. त्यामुळे तुम्ही शंखपुष्पीचे योग्य प्रमाणात सेवन करायला हवे.
- **गोटू कोला :** गोटू कोला अनेक बाबतीत फायदेशीर असल्याचे म्हटले जाते. अगदी त्वचेच्या समस्येपासून ते सेक्सपर्यंत त्याचे अनेक फायदे आहेत. पण तुमच्या मेंदुला चालना देण्यासाठीही गोटू कोला चांगले आहे. गोटू कोला नावाची वनस्पती तुमच्या स्मरणशक्तीसाठी चांगली असून तुम्ही त्याचे योग्य प्रमाणात सेवन करा. एका प्रयोगादरम्यान गोटू कोलाच्या वापरामुळे चांगले बदल झाल्याचे दिसून आले आहेत.


# ‘ओटमिल कूकिज’

### ‘ओटमिल कूकिज’साठी लागणारा साहीत्यः

- दिड कप मैदा
- १/२ टेस्पून बेकिंग पावडर
- १ टिस्पून बेकिंग सोडा
- १ बटर स्टिक, मऊसर (१/२ कप)
- १ + १/४ कप ब्राऊन शुगर
- एग रिप्लेसर पावडर, २ अंड्यासाठी
- १ टिस्पून वॅनीला
- दिड कप ओट्स
- १ कप चॉकोलेट चिप्स किंवा चंक्स

### ‘ओटमिल कूकिज’ची कृती :


- ओव्हन ३५० F (१७५ C) वर प्रिहीट करावे
- ओव्हन गरम होतय तोवर मध्यम भांड्यात मैदा, बेकिंग पावडर आणि बेकिंग सोडा चाळून घ्यावा.
- एका मोठ्या खोलगट भांड्यात बटर आणि ब्राऊन शुगर हलके होईस्तोवर फेसावे. एग रिप्लेसर पावडरमध्ये पाकिटावर लिहिलेल्या प्रमाणात पाणी घालून मिक्स करावे. हे मिश्रण घालून बटर+साखर फेटावे. त्यात मैदा घालून मिक्स करावे.
- आता ओट्स घालून हातानेच मिक्स करावे. चॉकोलेट चिप्स घालून व्यवस्थित मिक्स करावे.
- मिश्रण, ग्रिस केलेल्या बेकिंग ट्रेमध्ये आईसक्रिम स्कूपने एक-दोन इंचाच्या अंतरावर ठेवावे. नंतर स्कूप केलेले मिश्रणाचे गोळे हाताने दाब देऊन चपटे करावे. ओव्हनमध्ये मधल्या रॅकवर ट्रे ठेवून १६ ते १८ मिनीटे बेक करावे.
- बेक झाल्यावर ट्रे बाहेर काढून कूकिज गार होवू द्याव्यात.



# सिंधुदुर्गातील 'एमएच-०७' क्रमांकाच्या वाहनांना टोल नाही

## पालकमंत्री नितेश राणे यांचा जिल्हावासीयांना दिलासा

सिंधुदुर्ग जिल्ह्यात ओसरगाव टोल नाक्यावर टोल वसुलीला जरी सुरुवात झाली तरी जिल्ह्यातील वाहनांकडून (एमएच-०७) टोल घेतला जाणार नाही, याची जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून हमी देतो, अशा शब्दांत पालकमंत्री नितेश राणे यांनी जिल्हावासीयांना दिलासा दिला.







**■सिंधुदुर्ग। प्रतिनिधी,**
सिंधुदुर्ग जिल्ह्यात ओसरगाव टोल नाक्यावर टोल वसुलीला जरी सुरुवात झाली तरी जिल्ह्यातील वाहनांकडून (एमएच-०७) टोल घेतला जाणार नाही, याची जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून हमी देतो, अशा शब्दांत पालकमंत्री नितेश राणे यांनी जिल्हावासीयांना दिलासा दिला. वादळी वारे आणि पावसाचा फटका बसलेल्या सावंतवाडी शहराला राणे यांनी शनिवारी सकाळी भेट देऊन पाहणी केली. त्यावेळी पत्रकारांशी बोलताना त्यांनी वरील आश्वासन दिले.

तीन वर्षांपूर्वी जेव्हा टोलवसुलीचा प्रयत्न झाला होता तेव्हा आमदार असताना आपण टोलवसुली होऊ दिली नाही. व्यापारी संघाचे अध्यक्ष संजय सावंत हे माज्या संपर्कात होते, आहेत तेव्हा पालकमंत्री या नात्याने जिल्ह्यातील वाहनांकडून टोल वसूल केला जाणार नाही, असे राणे यांनी स्पष्ट केले.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग-66 वर टोल वसुलीची प्रक्रिया सुरु केली असून कणकवली जवळ ओसरगाव टोल नाक्यावर टोलवसुली करण्यासाठी संस्था नेमण्यासाठी निविदा काढली आहे. निविदा निघताच जिल्ह्यात संतप्त प्रतिक्रिया उमतटल्या असून टोलविरोधी कृती समिती आणि व्यापारी संघाने स्थानिकांकडून टोल वसूल करण्यास तीव्र विरोध दर्शविला आहे.

जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे यांचे या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यात आले असता त्यांनी वरील आश्वासन दिले.

**सिंधुदुर्गवर टोळधाड का...**

गोव्याला टोलमाफी तर मग सिंधुदुर्गवासीयांवर टोळधाड कशासाठी असा सवाल कणकवलीचे नगराध्यक्ष संदेश पारकर यांनी केला असून टोलविरोधी आंदोलनासाठी सिंधुदुर्गवासीयांनी आता सज्ज राहावे, असे आवाहन केले आहे.

ओसरगाव टोल नाका येथे आम्ही टोलवसुली होऊ देणार नाही. मात्र पोलीस बळाचा वापर करून जर तसा प्रयत्न झाला तर मग जिल्हावासीयांतर्फे तीव्र लढा उभारण्यात येईल, असा इशारा पारकर यांनी दिला आहे.

या टोल नाक्यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्याचे दोन भाग पडणार आहेत. कणकवलीसह देवगड, वैभववाडी आणि मालवण तालुक्यातील कांही गावांमधील ग्रामस्थांना जिल्हा मुख्यालयातील सर्व शासकीय कार्यालये, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आदी ठिकाणी वरचेवर ये-जा करावी लागते हे लक्षात घेऊन जिल्ह्यातील सर्वच एमएच-07 नोंदणीकृत सर्वच वाहनांना टोलमाफी मिळावी, अशी आग्रही मागणी त्यांनी केली.

**व्यापाऱ्यांचाही विरोध..!**

ओसरगाव टोल नाक्यावरील टोल वसुलीला जिल्ह्यातील व्यापाऱ्यांनी कडाडून विरोध केला आहे. टोल विरोधी कृती समितीनेही आंदोलनाचा इशारा दिला असून स्थानिकांना ये-जा करण्यासाठी ओसरगाव टोल नाक्याजवळ पयार्यी मार्ग तयार करावा अशी मागणीही कृती समिती आणि व्यापारी संघाने केली आहे. सिंधुदुगार्तील सर्व वाहनांना टोलमाफी द्यावी तसेच ओसरगाव येथे पयार्यी मार्ग तयार करावा, अशीही मागणी जिल्हावासीयांनी केली आहे.

# दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी मोठी बातमी! निकालाबद्दल महत्त्वाची अपडेट

**■ बातमी /लेख,**
**प्रीती दिपक नाईक**

**खाजगी पद्धतीने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची बातमी**
ज्या विद्यार्थ्यांना खाजगीरित्या परीक्षा द्यायच्या आहेत, त्यांच्यासाठी महत्त्वाची बातमी आहे. या परीक्षेसाठी फॉर्म नंबर 17 भरावा लागत होता. जून-जुलैमध्ये या खाजगी परीक्षा होत असतात. पण आता परीक्षेसंदर्भात बोडार्ने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आता खासगी विद्यार्थ्यांची नोंदणी ऑनलाइन पद्धतीने केली जाणार आहे.



उत्तराखंड बोर्ड ऑफ स्कूल एज्युकेशनने (UBSE) 10वी बोर्डाचा निकाल जाहीर शनिवारी (25 एप्रिल) लागला आहे. पण इकडे महाराष्ट्र बोर्डाच्या दहावी, बारावीचा निकाल कधी लागणार याच्या प्रतीक्षेत विद्यार्थी आणि पालक आहेत. दहावी, बारावीच्या निकालाबाबत मोठी बातमी समोर आली आहे.

यंदा निकाल उशिरा लागण्याची शक्यता आहे. बोर्डाच्या कर्मचारी आंदोलनाचा फटका दहावी, बारावीच्या निकालाला बसण्याची शक्यता आहे. 28 एप्रिलपासून महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक मंडळाच्या कर्मचाऱ्यांचा कामबंद आंदोलनाचा इशारा दिला आहे.

शिक्षण मंडळाची बढती आणि बदली 2 वर्षावरुन 4 ते 6 वर्षावर नेल्याने कर्मचारी संतप्त असल्याने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक मंडळाच्या कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. आंदोलनावर तोडगा न निघाल्यास निकालाचं काम रखडण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. राज्य शिक्षण कर्मचारी संघटनेला विश्वासात न घेता एकतर्फी निर्णय घेतल्याने विरोध त्यांनी कामबंद आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे.

दहावी-बारावीच्या (SSC-HSC Student) जून-जुलैमध्ये होणाऱ्या परीक्षेसाठी ऑनलाइन रजिस्ट्रेशन पूर्ण झाल्यानंतरच विद्यार्थ्यांना परीक्षेला देता येणार आहे. ही परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना नावनोंदणी करताना विद्यार्थ्यांच्या सध्याच्या पत्त्यातील जिल्हा, निवडलेले माध्यम, शाखेनुसार शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांची यादी देण्यात येणार आहे. त्यातून एका शाळा, कनिष्ठ महाविद्यालयाची निवड करावी लागणार आहे.

तर या परीक्षेसाठी नोंदणी शुल्क ऑनलाइन पद्धतीने भरायची आहे. त्याबाबतची पावती विद्यार्थ्यांच्या त्याच्या लॉगिनमध्ये मिळेल. विद्यार्थ्यांना नावनोंदणीसाठी mahahsscboard.in या संकेस्थळावर जायचं आहे.

# खारेगाव खाडी उड्डाणपूल खुला होणार

## ठाणे-मुंबई-नाशिक महामार्गावरील वाहतूककोंडीला दिलासा



**साकेत जुन्या पुलाच्या एका मार्गिकेचे काम अंतिम टप्प्यात**
ठाण्याहून नाशिकच्या दिशेने जाणाऱ्या जुन्या साकेत उड्डाणपुलाला समांतर नवीन पूल सुरू करण्यात आला असून सध्या एका मार्गिकेचे काम पूर्णत्वाकडे गेले आहे. ही मार्गिका येत्या सोमवारी किंवा मंगळवारी वाहतुकीसाठी खुली करण्यात येणार असून त्यानंतर दुसऱ्या मार्गिकेचे कामही हाती घेण्यात येणार असल्याची माहिती एमएसआरडीसी प्रशासनाने दिली आहे.

**■ठाणे। प्रतिनिधी,**
मुंबई-नाशिक महामार्गावरील साकेत उड्डाणपुलावरील एक मार्गिका वाहतुकीसाठी खुली करण्यात आल्यानंतर आता खारेगाव खाडी उड्डाणपूलही २८ एप्रिल रोजी वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे. त्यामुळे ठाण्याहून नाशिककडे जाणाऱ्या मार्गावरील वाहतूककोंडीचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटणार असल्याचा दावा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) केला आहे.

ठाणे महापालिका हद्दीतून जाणाऱ्या मुंबई-नाशिक महामार्गावर गेल्या काही वर्षात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. समृद्धी महामागार्शी जोडणी झाल्यामुळे भविष्यातील वाढती वाहतूक लक्षात घेऊन या मागार्चे रुंदीकरण तसेच उड्डाणपुलांची कामे हाती घेण्यात आली आहेत. खारेगाव टोलनाक्यानजीक जुन्या साकेत पुलाच्या शेजारी नवीन उड्डाणपूल उभारण्यात आला आहे. यामुळे ठाण्याहून नाशिकच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांना काही प्रमाणात दिलासा मिळाला असला तरी उड्डाणपूल संपल्यानंतर अरुंद रस्त्यामुळे वाहतूक पुन्हा मंदावत असल्याची स्थिती कायम आहे.

दरम्यान, खारेगाव खाडी उड्डाणपुलाचे बांधकाम पूर्ण झाले असून सध्या पुलाची लोड टेस्टिंग प्रक्रिया सुरू आहे. ही चाचणी शनिवारी पूर्ण होणार असून त्यानंतर तपासणी अहवाल जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांच्याकडे सादर करण्यात येणार आहे. त्यानंतर मंगळवार, २८ एप्रिल रोजी हा उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार असल्याची माहिती एमएसआरडीसीचे कार्यकारी अभियंता सुभाष बोरसे यांनी दिली. या प्रकल्पामुळे ठाणे-नाशिक मार्गावरील वाहतूककोंडीचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटेल, असा दावा एमएसआरडीसीकडून करण्यात आला आहे.

# 13 बारबालांसह 6 मुलींची भिंतीतील गुप्त खोलीतून सुटका

## नगरसेवकाच्या डान्सबारमधील अश्लील कृत्यांचा भांडाफोड




**■नाशिक। प्रतिनिधी,**
मीरा भाईंदरमधील एका नगसेवकाच्या डान्सबारवर पोलिसांनी छापा टाकल्यावर भयान सत्य समोर आले. अण्णा पॅलेस ऑर्केस्ट्रा बारवर छापा टाकल्यानंतर आतला नजरा पाहाताच पोलीस हबकले. या घटनेमुळे डान्सबारचा विषय पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. या कारवाईदरम्यान 13 बारबालांची सुटका करण्यात आली. ज्यापैकी 6 मुली गुप्त खोलीत लपवून ठेवण्यात आल्या होत्या. नियमापेक्षा जास्त मुली बारचालकाने गुप्त खोलीत लपवल्या आहे, असा संशय पोलिसांना आली होती. त्यानंतर या बारवर छापा टाकण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार बारचालक या मुलींकडून आर्थिक फायदासाठी अश्लील कृत्य करुन घेत असल्याचे चौकशीदरम्यान समोर आलं आहे.

'अण्णा पॅलेस' नावाचा ऑर्केस्ट्रा बार हा भाईदर पूर्व, गोडदेव फाटक रोड नवघर इथे आहे. पोलिसांना मिळालेल्या टीपनंतर इथे छापा टाकण्यात आला. पोलिसांनी मिळालेल्या गुप्त माहितीनंतर २३ एप्रिल रोजी मध्यरात्री पोलिसांनी ऑर्केस्ट्रा बारवर गेले. ज्यावेळी पोलिसांनी छापा मारला तेव्हा बारमध्ये स्टेजवर ४ महिला सिंगर्स तोकडे कपडे परिधान करून अश्लिल अंगविक्षेप करताना आढळून आले. पोलिसांना पाहताच बारमधील मद्यपी आणि स्टाफची धावाधाव सुरू झाली.

'अण्णा पॅलेस' ऑर्केस्ट्रा बार हा नगरसेवक गणेश शेट्टी यांच्या मालकीचा आहे. 13 बारबालकांची सुटका केल्यानंतर पोलिसांनी केवळ नोटीस देऊन त्यांना सोडून दिल्याचे वृत्त आहे. हा बार कायमच वादग्रस्त राहिला असून पालिकेने 2013 साली ऑर्केस्ट्रा बार असलेली इमारत अनधिकृत घोषित करण्यात आली होती.

गुरुवारी रात्री पोलिसांनी छाप टाकल्यानंतर बार व्यवस्थापनाने तातडीने कर्णकर्कश म्युझिक बंद केला. पण दुसरीकडे कॅव्हिटीमध्ये बारगर्लना लपवण्यात आले पण पोलिसांना संशय आला. त्यानंतर पोलिसांनी झाडाझडती सुरु केल्यानंतर बाथरूमच्या बाजूला भिंतींच्या कप्प्यात कॅव्हिटी असल्याचा संशय आला. एका बटणाने ८ बाय अडीच फूट अरुंद कॅव्हिटीमध्ये 6 मुली आणि 1 मुलगा दाटीवाटीने गुदमरल्या अवस्थेत आढळून आले आहेत. इलेक्ट्रॉनिक सॉकेटच्या आधारे उघडणाऱ्या या कॅव्हिटीतून पोलिसांनी त्या सर्वांची सुटका केली.

# मुंबईत 12 वर्षाच्या मुलीची छेडछाड... अश्लील व्हिडिओ दाखवून डिलिव्हरी बॉयचा संतापजनक प्रकार

**■मुंबई। प्रतिनिधी,**
मुंबईतून एक संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे, ज्यात सुट्टे पैसे देण्याच्या बहाण्याने एका वर्षीय मुलीला अश्लील व्हिडिओ दाखवले. या प्रकरणी डिलिव्हरी बॉयला मालाड पोलिसांनी अटक केली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाल्याचं चित्र आहे. आरोपीने आणखी कोणत्या मुलींसोबत अश्लील कृत्य केलं याचा पोलीस सध्या तपास घेत आहेत. आरोपीच्या अशा कृत्याने परिसरात खळबळ उडाली असून या प्रकरणी पोलीस सविस्तर माहिती मिळवत आहेत. या प्रकरणात पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. अटक केलेल्या तरुणाची ओळख मोहम्मद उपेश अनवर अंसारी (वय 24) अशी ओळख समोर आली.



**सुट्टे पैसे देण्याच्या बहाण्याने मुलीला अश्लील व्हिडिओ दाखवले**
पोलिसांच्या माहितीनुसार, मालाड पोलिसांनी एका महिलेला ऑनलाईन साडीची ऑर्डर दिली होती. अशातच जेव्हा डिलिव्हरी बॉय हा महिलेच्या घरी साडी घेऊन पोहोचला असता, 12 वर्षांची पीडित मुलगी घरात एकटीच होती. त्याने सांगितलं की, त्याच्याकडे सुट्टे पैसे नसल्याने माज्यासोबत पैसे आणण्यासाठी पाठवा, मी पैसे देतो. नंतर डिलिव्हरी बॉयसोबत मुलगी गेली असता, पैसे पाठवलेले डिटेल्स दाखवण्याच्या बहाण्याने, त्याने तिला मोबाईल फोनवर अश्लील व्हिडिओ दाखवण्यास सुरुवात केली. दरम्यान, मुलगी आरडाओरड करू लागल्यानंतर तो घटनास्थळावरून पळून गेला.

**मोबाईल आणि सीसीटीव्हीच्या माध्यमातून प्रकरण उघडकीस**

पोलिसांच्या तपासातून माहिती समोर आली की, मोबाईल आणि सीसीटीव्हीच्या माध्यमातून प्रकरण उघडकीस आले. या प्रकरणानंतर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करत एफआरआय नोंदवण्यात आला. दरम्यान, आरोपीने इतरत्र ठिकाणी असे हैवानी कृत्य केल्याचा तपास करत आहेत. याआधी देखील डिलिव्हरी बॉयने अश्लील कृत्य केल्याच्या अनेक बातम्या समोर आलेल्या आहेत.

महिलेनं आपल्या मुलाला आणि नवऱ्याला या घटनेची माहिती दिली होती. मालाड पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल करत त्याला अटक केली. या घटनेनं परिसरात एकच खळबळ उडाल्याचं चित्र आहे.

# बुलढाण्यात लग्नात नाचताना चुकून लागला धक्का... आनंदाचे वातावरण शोकात पसरले

**■बुलढाणा। प्रतिनिधी,**
बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव शहरात एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. लग्नातील डीजेवर नाचताना लागलेल्या एका क्षुल्लक धक्क्यावरून झालेल्या वादाचे रूपांतर हत्येत झाले असून, एका 23 वर्षीय तरुणाला आपला जीव गमवावा लागला आहे. या घटनेमुळे संपूर्ण बर्डे प्लॉट परिसरात खळबळ उडाली असून भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

**नेमकी घटना काय?**
मिळालेल्या माहितीनुसार, शोएब खान अमीन खान (वय २३, रा. बर्डे प्लॉट, खामगाव) असे मृत तरुणाचे नाव आहे. बर्डे प्लॉट भागातील स्मशानभूमीजवळ एका लग्न समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात डीजेच्या तालावर अनेक तरुण नाचत होते. हे तरुण मजामस्ती करत नाचताना दिसत होते. नाचत असताना शोएब खान याचा धक्का चुकून दुसऱ्या एका तरुणाला लागला.



**वादाचे हिंसक वळण आणि भीषण हल्ला**

नाचताना लागलेल्या या धक्क्यावरून सुरुवातीला दोन्ही बाजूंनी शाब्दिक बाचाबाची झाली. मात्र, काही वेळातच या वादाने हिंसक वळण घेतले. परिसरातील 4 ते 5 जणांनी संगणमत करून शोएबवर धारदार शस्त्रे आणि ह्यफायटरह्नने भीषण हल्ला चढवला. हा हल्ला इतका भयानक होता की, गंभीर जखमी झालेला शोएब जागीच ठार झाला.

**पोलिसांचा बंदोबस्त आणि तपास**

घटनेची माहिती मिळताच खामगाव पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. या हत्येमुळे परिसरात तणाव वाढल्याने खबरदारीचा उपाय म्हणून पोलिसांनी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली असून, फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी तपास पथके रवाना करण्यात आली आहेत.

# विवस्त्र मृतदेह, पाय बांधलेले अन्...

## रायगडच्या लॉजवरील रुम नंबर 101 मधील मर्डरचं गूढ उलगडलं




**आरोपी अटकेत**
आरोपी मूळचा रत्नागिरी जिल्ह्यातील सराईत गुन्हेगार असल्याचे समोर आले. अनिस मोहमद खान मालदार हा गुन्हा घडल्यापासून फरार होता. गोरेगाव पोलिस स्टेशनने हत्या, बलात्कारासारख्या गंभीर कलमांसोबतच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा अंतर्गत गुन्हा दाखल केला. फॉरेन्सिक तपास, तांत्रिक पुरावा आणि विशेष पथकाने गुन्हा घडल्यानंतर सहा दिवसांनी नवी मुंबई परिसरातून आरोपीला अटक केली असून आता त्याला चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. आरोपीला न्यायालयात हजर करण्यात आलं तेव्हा मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

**■पुणे। प्रतिनिधी,**
रायगडच्या लोणेरे येथील पल्लवी मोरे हत्याकांड प्रकरणामधील आरोपी अनिस मोहमद खान मालदार याला अलीबागच्या जिल्हा सत्र न्यायालयाने 30 एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. गुन्हा घडल्यानंतर तब्बल सहा दिवसांनी आरोपी मालदार पोलिसांच्या हाती लागला आहे. स्थानिक गुन्हे शाखा आणि पोलिस ठाण्याची आठ ते दहा पथके आरोपीच्या मागावर होती. काल रात्री ठाणे परिसरातून आरोपीला जेरबंद करण्यात आले. आज त्याला अलिबाग येथील न्यायालयासमोर हजर करण्यात आले. आरोपीने मृत तरुणी पल्लवी मोरे हिला लोणेरे येथील लॉजवर नेले. तिथं आधी तिच्यावर बलात्कार केला आणि नंतर तिचा धारदार शस्त्राने खून केला. या घटनेनंतर गोरेगाव परिसरात वातावरण संतप्त झाले होते. आरोपी विरोधात यापूर्वी देखील गुन्हे दाखल आहे. आरोपीने हा गुन्हा का केला याचा शोध आता पोलिस घेत आहेत, अशी माहिती उपविभागीय पोलिस अधिकारी शंकर काळे यांनी दिली.

**विवस्त्र अवस्थेत, पाय बांधलेल्या स्थितीत लॉजवर सापडाला मृतदेह**

रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातील वडगाव बौद्धवाडी (बौद्धवाडी) येथील 22 वर्षीय पल्लवी मोरेचा मृतदेह मुंबई-गोवा महामार्गावरील लोणेरे येथील ओमकार रेसिडेन्सी लॉजिंगच्या खोली क्र. 101 मध्ये विवस्त्र अवस्थेत, पाय बांधलेल्या स्थितीत, कोयत्याने अनेक वार केलेल्या अवस्थेत आढळला होता. तिच्यावर लैंगिक अत्याचार झाल्याचेही स्पष्ट संकेत मिळत होते. या प्रकरणामध्ये मृतदेहाचं शविच्छेदन करण्यात आलं. रविवार 20 एप्रिल रोजी, सकाळी 11 वाजता पल्लवी 'कामावर जाते' असे सांगून घरून निघाली. ती घरी परतली नाही. तिने बहिणीचे फोन कॉल्सही उचलले नाहीत. कुटुंबीयांनी शोध घेतल्यावर लॉजमध्ये भयानक दृश्य समोर आले. सफाई कर्मचाऱ्याने दरवाजा उघडताच मृतदेह दिसला. प्रेमप्रकरणातून वाद झाला आणि त्याचे पर्यावसान हत्येत झाले असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आलेला.

# बायपास ऑपरेशन झाले अन् छातीवर लाथाबुक्क्यांनी प्रहार करुन केली हत्या

## खेड पोलिसांची मोठी कारवाई

**■रत्नागिरी। प्रतिनिधी,**
खेड तालुक्यातील मेटे मोहल्ला येथे जुन्या भांडणातून एका 55 वर्षीय व्यक्तीची छातीवर बुक्यांनी प्रहार करून हत्या केल्याप्रकरणी फरार असलेल्या तीन आरोपींना खेड पोलिसांनी गुरुवारी अटक केली आहे.

गेल्या 17 दिवसांपासून पोलीस चकवा देणाऱ्या या आरोपींना खेड एस.टी. स्टँड परिसरातून ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्यावर भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



**जुना वाद**

या प्रकरणाची अधिक माहिती अशी की, 6 एप्रिल 2026 रोजी संध्याकाळी मेटे मोहल्ला परिसरातील कब्रस्तान जवळील रस्त्यावर शफी अब्दुल्ला वरवटकर (55) आणि आरोपींमध्ये जुन्या भांडणावरून वाद झाला होता.

**सापळा रचून अटक**
आरोपी खेड शहरात येणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळताच, खेड एस.टी. स्टँड परिसरात सापळा रचून कादिर शमशुद्दीन घारे (48), गणी ईस्माईल बोट (54) आणि अशरफ महामुद बोट (५५) यांना रात्री 8.23 च्या सुमारास अटक करण्यात आली. ही यशस्वी कामगिरी रत्नागिरीचे पोलीस अधीक्षक नितीन दत्तात्रय बगाटे, अपर पोलीस अधीक्षक बी.जी. महामुनी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी शैलेश सणस यांच्या मार्गदर्शनाखाली खेडचे पोलीस निरीक्षक विवेक अहिरे, पोलीस उपनिरीक्षक श्रीकृष्ण येवले आणि त्यांच्या पथकाने केली आहे.

**बायपास झाले हे माहित असूनही...**

शफी यांचे हृदयाचे बायपास ऑपरेशन झाले आहे हे माहिती असूनही, आरोपी अशरफ महामुद बोट, गणी ईस्माईल बोट आणि कादिर शमशुद्दीन घारे यांनी त्यांना शिवीगाळ करत छातीवर हाताच्या बुक्यांनी आणि लाथाबुक्क्यांनी गंभीर मारहाण केली. या हल्ल्यात शफी वरवटकर यांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर खेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता, मात्र हे तिन्ही आरोपी तेव्हापासून फरार होते.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com